दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com
lakshamaha.dhule@gmail.com
lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : ३४४ वा | मंगळवार दि. १० ऑक्टोबर २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## निवडणूक आयोगाने आकडा तपासून पहावा : शरद पवार गट



**मुंबई ।** राष्ट्रवादी काँग्रेसमधील सत्तासंघर्षावर आज पुन्हा एकदा निवडणूक आयोगापुढे सुनावणीला सुरुवात झाली आहे. यासंबंधी शुक्रवारी झालेल्या सुनावणीत अजित पवार गटाने शरद पवारांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करत त्यांच्यावर पक्षाचा कारभार एककल्लीपणे चालवण्याचा आरोप केला होता. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व निवडणूक चिन्ह आपल्यालाच मिळावे अशी मागणीही केली होती. त्यावर शरद पवार गटाने जोरदार हरकत घेतली होती. तसेच आयोगाला आगामी निवडणुकांपर्यंत पक्षाचे चिन्ह न गोठवण्याची विनंती केली होती.

## न्यूज कॉलम

### वृध्देची चार तोळ्याची सोनपोत लंपास

**धुळे ।** शहरातील खान्देश गोशाळेच्या मैदानावर कथा समाप्तीनंतर गर्दीत वृध्देची चार तोळ्याची सोनपोत चोरट्यांनी लंपास केली. बापु यादव खान्देश गोशाळा मैदानावर कथा ऐकण्यासाठी गेल्या होत्याकथा समाप्तीनंतर झालेल्या गर्दीत दोन इसमांनी त्यांच्या पर्समधील चार तोळे वजनाची सोनपोत लंपास केली. तिची किंमत १ लाख ४४ हजार ४५१ इतकी आहे. याप्रकरणी सौ.यादव यांनी दिलेल्या फिर्यादीवरून किरण कालु कुमार व शांती कुमार या दोघा संशयीत आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### मुंबईच्या तरुणाकडून गांजा जप्त

**धुळे ।** शिंदखेडा तालुक्यातील नरडाणा या ठिकाणी मुंबईच्या तरुणाकडून पोलिसांनी गांजा जप्त केला. नरडाणा पोलिस ठाण्यात याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नरडाणा रेल्वे स्थानक जवळ एक जण संशयास्पदरीत्या बॅग घेऊन उभा आहे, अशी माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी तरुणाची चौकशी व झडती घेतल्यावर त्यात सुमारे ३ किलो गांजा मिळून आला. समीर मीरासाब शेख असे त्याचे नाव आहे.


# मनसेची 'टोल'धाड : राज ठाकरेंच्या इशाऱ्यानंतर मनसे सैनिक आक्रमक

### अनेक टोलनाक्यांवरून वाहने विनाटोल सोडण्याचा प्रयत्न

**मुंबई । प्रतिनिधी**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी टोलबाबत घेतलेल्या आक्रमक पवित्र्यानंतर मनसे सैनिकांनी टोल नाक्यावर उभे राहत चार चाकी वाहने सोडली. त्यानंतर पोलिसांनी मनसैनिकांची पोलिसांनी धरपकड केली. वाशी आणि दहिसर टोल नाक्यावरून कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत टोलच्या मुद्यावर आक्रमक भूमिका घेतली. वाहन चालकांना टोल न देण्याचे आवाहन राज यांनी केले. ज्या टोल नाक्यावरून टोल घेतला जाईल, तो टोल नाका पेटवून देण्याचा इशारा राज ठाकरे यांनी दिला. राज यांच्या पत्रकार परिषदेनंतर मनसैनिकांना टोल नाक्यावर जात वाहने टोलशिवाय सोडण्यास सुरुवात केली.

मनसैनिकांच्या आक्रमक पवित्र्यानंतर पोलिसांनी परिस्थिती चिघळू नये यासाठी टोल नाक्यावर धाव घेतली. वाशी टोल नाक्यावर आंदोलन करणाऱ्या मनसे कार्यकर्त्यांना पोलीसांनी ताब्यात घेतले. मनसेच्या २५ ते ३० कार्यकर्त्यांना वाशी पोलिसांनी ताब्यात घेत त्यांना पोलीस ठाण्यात नेले. तर, दुसरीकडे पश्चिम द्रुतगती महामार्गावरील दहिसर टोल नाक्यावर आंदोलन करणाऱ्या मनसे कार्यकर्त्यांची पोलिसांनी धरपकड केली. या ठिकाणाहून २० ते २५ मनसे कार्यकर्त्यांना दहिसर पोलिसांनी ताब्यात घेतले. महाराष्ट्रात प्रत्येक राजकीय पक्षाने टोलमुक्तीची घोषणा केली होती. त्याबाबत राज ठाकरे यांनी आजच्या पत्रकार परिषदेत देवेंद्र फडणवीस, अजित पवार, उद्धव ठाकरेंचे व्हिडीओ दाखवले होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात लहान वाहनांना टोलच नाही असं म्हटलं होतं. राज ठाकरे यांनी आज पत्रकार परिषदेत तब्बल सात व्हिडिओ दाखवत देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे या सर्वांवरच हल्ला चढवला. निवडणुकीपूर्वी या सर्व नेत्यांनी आपल्या प्रचार सभेत आपण टोलमुक्त महाराष्ट्र करू, असे आश्वासन दिले होते. त्यानंतर यातील प्रत्येक नेता सत्तेत आला. मात्र, कुणीही टोल बंद केले नाही, अशी टीका राज ठाकरेंनी केली. राज ठाकरेंनी यावेळी उद्धव ठाकरे, देवेंद्र फडणवीस तसेच दिवंगत भाजप नेते गोपीनाथ मुंडे यांचे प्रचारसभेचे व्हिडिओ दाखवले. यामध्ये हे सर्व नेते टोलमुक्त महाराष्ट्राचे





### अविनाश जाधव ताब्यात

**नवी मुंबईतील टोलनाक्यांवरही मनसैनिकांनी धाव घेतली होती. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुचाकी, तीन चाकी व चारचाकी वाहनांना टोल माफ असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यानुसार आम्ही लोकांना टोलमाफी मिळाल्याची माहिती देत आहोत, असे अविनाश जाधव यांनी यावेळी सांगितले. जाधव यांची यावेळी पोलिस अधिकाऱ्यांसोबत शाब्दिक बाचाबाची झाली. त्यानंतर पोलिसांनी जाधव यांच्यासह मनसेच्या काही पदाधिकाऱ्यांना ताब्यात घेतले. जाधव यांच्या अटकेमुळे मनसेचे कार्यकर्ते अधिकच आक्रमक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.**

### टोल हा राज्यातील सर्वात मोठा घोटाळा

**राज ठाकरे यांनी आज आपले निवासस्थान शिवतीर्थ येथे पत्रकार परिषदेत भूमिका मांडली. यावेळी टोलवसुली हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा स्कॅम आहे, असा दावा राज ठाकरे यांनी केला. राज्यातील टोलवसुलीवर अनेक राजकारण्यांचे उदरनिर्वाह होत आहे. अनेकांना या टोलवसुलीतून दर दिवसाला, आठवड्याला, महिन्याला पैसे मिळतात. त्यामुळे हे नेते कधीही चांगले रस्ते होऊ देणार नाही. प्रत्येक टोलनाक्यावरुन किती टोलवसुली होत आहे? कधीपर्यंत टोलवसुली केली जाणार आहे? याचा हिशेब झालाच पाहीजे, असे राज ठाकरे म्हणाले.**

### धुळ्यात टोल न भरताच सोडली वाहने

**मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या इशाऱ्यानंतर मनसैनिक आक्रमक झालेत. संपूर्ण नवी मुंबईत मनसैनिकांनी आंदोलनाला सुरूवात केलीये. ऐरोली, ठाणे आणि पनवेल, धुळ्यात देखील आंदोलन करण्यात येत आहे. मनसे कार्यकर्त्यांच्या 'टोल'धाडीनंतर अनेक ठिकाणी टोल न भरता वाहने सोडण्यात आलीत.**

# येणाऱ्या काळात नाशिकचा कायापालट होणार : मंत्री भुसे



### कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर चाय पे चर्चा कार्यक्रमास पालकमंत्र्यांची उपस्थिती

**नाशिक । प्रतिनिधी**

शहरात कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आर्किटेक्स आणि इंजिनिअर्स असो., नाशिक आयोजीत 'चाय पे चर्चा' या कार्यक्रमास काल नाशिक जिल्हा पालकमंत्री दादाजी भुसे उपस्थित होते. यावेळी उपस्थित नागरिकांनी शहराच्या विकासाबाबत उहापोह करत चर्चा केली. तर काही नागरिकांनी यावेळी सूचना केल्या असून त्यांचे स्वागत असल्याचे मंत्री भुसे म्हणाले. भविष्यात देखील नागरिकांनी आपल्या सूचना पालकमंत्री कार्यालयात लेखी स्वरूपात देण्याचे आवाहन यावेळी त्यांनी केले.

ना.भुसे पुढे म्हणाले की, नाशिक ही कुंभनगरी असून कुंभमेळा ही नाशिककरांसाठी पर्वणीच आहे. मात्र यानिमित्ताने शहराचा विकास करण्याची देखील मोठी संधी आणि पर्वणी आहे. येणाऱ्या काळात कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहराचा कायापालट केला जाईल. चांगल्या सूचनांच्या आधारे आपली वाटचाल विकासाच्या दृष्टीने राहील. शासन आपल्या सोबत आहेच, मात्र नागरिकांची देखील जबाबदारी असून नागरिकांनी पुढे यायला हवे. नाशिक मॉडेल म्हणून राज्यात नाशिक नावारूपास येत असल्याचे प्रतिपादन मंत्री भुसे यांनी केले.

शहराचा विकास करायचा असेल तर विद्यार्थी, शिक्षक, डॉक्टर, वकील, इंजिनियर, आर्किटेक्चर तसेच इतरही तज्ञ नागरिकांनी आपला सक्रिय सहभाग घेवून शहराच्या विकासात काय उपाययोजना केल्या पाहिजेत याबाबत सूचना कराव्यात. कुंभमेळ्याच्या दृष्टीने पुढच्या शंभर वर्षांचा विचार करून काम करावे लागणार आहे. यासाठी प्रत्येकाने आपले म्हणून काम करायला हवे असे आवाहन ना. भुसे यांनी केले.

नाशिक हे येणाऱ्या काळात शैक्षणिक हब म्हणून नावारूपास येणार आहे. 'क्वालिटी सिटी'च्या माध्यमातून नाशिक परिवर्तनाची कात टाकत आहे. सकारात्मक बदल हे दिशा दर्शक असणार आहे. या कार्यक्रमास मनपा आयुक्त डॉ. अशोक करंजकर, नरेंद्र भुसे, शिवसेना जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, शिवसेना महानगर प्रमुख बंटी तिदमे, उदय सांगळे, मनपा शहर अभियंता शिवकुमार वंजारी तसेच शहरातील नागरिक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रकाश आंबेडकर यांच्या उपस्थितीत २६ रोजी आदिवासी एल्गार सभेचे आयोजन

**धुळे । प्रतिनिधी**



वंचित बहुजन आघाडी प्रणित एकलव्य आघाडीच्या वतीने गुरुवार दि. २६ ऑक्टोबर २०२३ रोजी दुपारी ३ वाजता धुळे शहरातील विद्यावर्धिनी महाविद्यालयाच्या प्रांगणात बहुजन प्रकाश आंबेडकर यांच्या दलित, आदिवासी, ओबीसी, भटके विमुक्त जाती जमाती, अल्पसंख्यांक मुस्लीम यांच्या न्याय हक्कासाठी धुळे जिल्हा एकलव्य आघाडीच्या वतीने आदिवासी एल्गार सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. धुळे जिल्ह्यातील नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

गेल्या दशकापासून देशामध्ये दलित, आदिवासी, ओबीसी, मुस्लीम, भटके कष्टकरी शेतकरी, शेतमजुर, वंचित महिला नोकरवर्ग तसेच देशातील तमाम भारतीय नागरिकांचे हक्क अधिकार या पासून वंचित ठेवण्यात आलेले आहेत. वंचित घटकांचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक जो विकास व्हायला हवा होता तो सध्याच्या परिस्थितीमध्ये थांबलेल्या अवस्थेत दिसून येतो. युवकांच्या हाताला रोजगार नाही, सुशिक्षित युवकांना नोकऱ्या नाहीत. आहेत ते उद्योगधंदे शासन खाजगीकरण करीत आहे. आहेत त्या सरकारी जागांवर शासनाच्या वतीने कंत्राटी पध्दतीने नोकरभरती केली जात आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्कात भरमसाठ वाढ केली जात आहे. आहेत त्या सरकारी शिक्षण संस्था बंद पाडण्याचा व खाजगी लोकांकडे हस्तांतरीत करण्याचा कल दिसत आहे. लोकांनी निवडून दिलेले लोकप्रतिनिधी सर्रासपणे आपल्या व्यक्तीगत स्वार्थासाठी स्वतः च्या विकासासाठी कामे करीत आहेत. या सर्व गोष्टी लोकांसमोर जाहीरपणे दिसत असतांना देखील या बाबतीत विरोधी पक्षातील निवडून दिलेले प्रतिनिधी ब्र शब्दही बोलत नाही. अशा परिस्थितीमध्ये वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर हे सत्ताधारी राजकीय पक्षातील तसेच विरोधी पक्षातील निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींच्या विरोधात आवाज उठवून वंचित घटकांसाठी लढणारे देशातील एकमेव नेते दिसत आहेत. सद्यस्थितीला प्रकाश आंबेडकरांची प्रत्येक घटकाला गरज वाटत आहे. म्हणून सर्व बहुजन समाजातील शोषित वंचित घटकांनी गुरुवार दि. २६ ऑक्टोबर २०२३ रोजी दुपारी ३ वाजता धुळे शहरातील विद्यावर्धिनी महाविद्यालय धुळे या सभेला उपस्थित राहण्याचे आवाहन ॲड रविकांत वाघ, वंचितच्या एकलव्य आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड सतोष जाधव, वंचितचे जिल्हा संघटक शंकर खरात, सुरेश बैसाणे, गणेश सोनवणे आदी केले आहे.

# 'कामधंदा सोडून अंतरवलीला या..' जरांगे पाटलांची मराठा बांधवांना हाक

**नाशिक । प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाचा लढा उभारलेले मनोज जरांगे पाटील सध्या राज्याचा दौरा करत आहेत. गावागावात, चौकाचौकात मनोज जरांगे पाटील यांचे जल्लोषात स्वागतही होत आहे. आज (सोमवार, ९ ऑक्टोंबर) मनोज जरांगे पाटील यांची नाशिकच्या येवल्यामध्ये जाहीर सभा झाली. यावेळी त्यांनी आरक्षण घेतल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असा विश्वास व्यक्त केला.

राज्यात सध्या मराठा आरक्षणावरून राजकारण चांगलेच तापले आहे. तर दुसरीकडे मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि मंत्री छगन भुजबळ यांच्यामध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. आज मंत्री छगन भुजबळांचा बालेकिल्ला असलेल्या येवल्यामध्ये मनोज जरांगे पाटील यांची सभा होत आहे. या सभेची जय्यत तयारी करण्यात आली असून या सभेत मनोज जरांगे पाटील काय बोलतात हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. त्याआधी मनोज जरांगे पाटील यांनी पत्रकार परिषद घेत पुन्हा एकदा भुजबळांवर हल्लाबोल करत त्यांना इशारा दिला. यावेळी बोलतांना मनोज जरांगे म्हणाले की, छगन भुजबळ माझ्या एकट्याच्या विरोधात बोलतात, म्हणून आम्ही बोललो. आता ते म्हणतात की, मराठा समाजाच्या आरक्षणाला विरोध नाही, आम्हाला तेच पाहिजे होते. विनाकारण कोणाला टार्गेट करण्याचा माझा धंदा नाही. तसेही आरक्षण देऊ नका, असे बोलणारे तुम्ही कोण? असा सवाल करत कुणी मराठा आरक्षणाला विरोध केला तर सोडणार नाही, मग तो कुणीही असो, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला. यानंतर शहरातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासमोर बसलेल्या उपोषणकर्त्यांची भेट घेत मराठा बांधवाना संबोधित केले. त्यानंतर मनोज जरांगे पाटील यांची येवल्यात सभाआयोजित करण्यात आली होती.

# धुळ्यात मारहाणीत २७ वर्षीय तरुणाचा मृत्यू



### खुनाचा गुन्हा दाखल

**धुळे । प्रतिनिधी**

शहरातील नवनाथ नगरात रहाणार्या एका तरूणाची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. मध्यरात्रीच्या सुमारास वरखेडे डेपो परिसरात त्याच्यावर धारधार शस्त्रांनी हल्ला करण्यात आला. या जीवघेण्या हल्ल्यात तरूण गंभीररित्या जखमी झाल्याने त्याला उपचारार्थ हिरे रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचार सुरू असताना तो आज सकाळी दगावला. याप्रकरणी पोलिसांनी संशयितांची धरपकड चालू केली आहे. शुभम जगन साळुंके (२७) असे मृत तरूणाचे आहे.

मिळालेल्या माहितीनुसार रात्री ११.३० वाजेच्या सुमारास काही जणांनी शुभमला गांधी पुतळ्याजवळ मारहाण केली. यानंतर हल्लेखोरांनी शुभमला आपल्या दुचाकीवर बसवून वरखेडे कचरा डेपो परिसरात नेले. तेथे त्याला बेदम मारहाण करून त्याच्यावर धारदार शस्त्राने सपासप वार करण्यात आले. यात तो रक्तबंबाळ झाला. शिवाय, अंगावर मोठे दगडं टाकून त्याच्या पायांच्या हाडांचा अक्षरशः चुरा करण्यात आला. दरम्यान, शुभम निचपित पडल्याचे पाहून हल्लेखोर घटनास्थळावरून पसार झाले. सदर घटनेचे वृत्त पोलिसांना कळताच आझाद नगर पोलीस ठाण्याचे पोकॉ. प्रशांत पाटील, हवालदार प्रवीण दराडे हे वरखेडे कचरा डेपोच्या परिसरात सव्वा बाराच्या सुमारास दाखल झाले. पोलिसांनी गंभीर जखमी असलेल्या शुभम साळुंकेला त्यांच्याच शासकीय वाहनाने हिरे रुग्णालयात भरती केले.

### अनेकांशी वाद

**शुभम याचे आई-वडिल निवर्तले असून तो मामा आणि आजीकडे रहायला होता. तेच त्याचा सांभाळ करत. यापुर्वीही शुभमचा काही जणांशी विकोपाचा वाद झाला होता. यात तो अनेकदा जायबंदी झाला आहे. जुना वाद किंवा खुन्नसमधूनच त्याचा काटा काढल्याची चर्चा आहे. कालही त्याच्या घरावर दगडफेक झाल्याचे समजते. यानंतर त्याने काही जणांना शिवीगाळ केली होती. पोलीस त्या दिशेनेही तपास करत आहेत.**

# रस्त्यांवर खड्डेच-खड्डे, मग टोल कशाचा घेता?

### काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते थोरात सरकारवर संतापले

### ट्रिपल इंजिन सरकार विरोधात जनमानसात प्रचंड असंतोष

**नाशिक । प्रतिनिधी**

विद्यमान ट्रिपल इंजिन सरकारने महाराष्ट्राची परिस्थिती अत्यंत दयनीय करून टाकली आहे. राज्यातल्या सर्वच प्रमुख रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य झाले आहे, गाडी चालवणे आणि प्रवास करणे, हे जीवावर बेतणारे आहे. रस्त्यावरचा प्रत्येक खड्डा महायुती सरकारच्या नाकर्तेपणाची साक्ष देतो, रस्त्यावर असणारे खड्डे आणि त्यावर जर मार्गच काढायचा नसेल तर टोल कशाचा घेता? असा संतापजनक सवाल काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी उपस्थित केला.

नाशिक येथे उत्तर महाराष्ट्र विभागीय आढावा बैठकीच्या निमित्ताने ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात आले होते, यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, आ. कुणाल पाटील, आ. प्रणिती शिंदे, माजी मंत्री डॉ. शोभा बच्छाव, शरद आहेर आदी उपस्थित होते. थोरात म्हणाले, नाशिक-मुंबई महामार्गाची परिस्थिती वाईट आहे. अडीच तासांच्या प्रवासाला चार ते साडेचार तास लागतात. एका-एका जागेवर तासभर प्रतीक्षा करावी लागते. भिवंडीमध्ये तर रस्ता कोणता? आणि खड्डे कोणते? हे शोधणे मुश्किल झालेले आहे. भिवंडीतली वाहतूक कोंडी जीवघेणी ठरते आहे. या महामार्गावर झालेल्या खड्यांबद्दल कोणीही चकार शब्द बोलायला तयार नाही, टोलची वसुली मात्र बिनबोभाट सुरू आहे. हीच परिस्थिती राज्यातल्या सगळ्यात महामार्गांची झालेली आहे. जनमानसात असंतोष वाढत आहे.

थोरात म्हणाले, अधिवेशनादरम्यान नाशिक-मुंबई महामार्गावरील वाहतूक कोंडी आणि खड्डे यांच्यावर काँग्रेसने आवाज उठवला. मंत्री यांनी तातडीने त्यावर कारवाई करतो असे आश्वासनही दिले, मुख्यमंत्री यांनाही आम्ही या प्रश्नाचे गांभीर्य समजावून सांगितले होते, मात्र वाहतूक कोंडीत सुधारणा होण्याऐवजी वाढ झालेली आहे.





### काँग्रेस जनतेच्या उद्रेकासोबत

**टोलच्या संदर्भाने राज ठाकरेंनी काय भूमिका घ्यावी, हा त्यांचा प्रश्न आहे मात्र जनतेमध्ये प्रचंड उद्रेक आहे आणि काँग्रेस जनतेच्या या उद्रेकासोबत आहे. रस्त्यावरच्या खड्ड्या बाबतीत काँग्रेसची भूमिका स्पष्ट आहे. आम्ही वारंवार हा प्रश्न लावून धरला, विधानसभेत मांडला. सरकारकडून पर्याय मिळत नसल्याने जनतेच्या मनात भरमसाठ टोल आणि भरमसाठ खड्डे यामुळे जनतेच्या मनात प्रचंड संताप आहे.**

### प्रत्येक गचक्यात सरकारचा नाकर्तेपणा

**नाशिक-मुंबई रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यातून जात असताना सामान्य माणसांना जो गचका बसतो तो प्रत्येक गचका ट्रिपल इंजिन सरकारच्या नाकर्तेपणाची आठवण करून देतो. भरमसाठ टोल आकारायचे, मात्र रस्त्यांची साधी डागडुजी सुद्धा नाही, वाहतूक कोंडीवर मार्ग काढायला सरकार तयार नाही.**

# सप्तशृंगी देवी तीर्थक्षेत्राच्या सुधारित विकास आराखड्याला मान्यता

**मुंबई । प्रतिनिधी**

दोन दिवसांपूर्वी नाशिक दौऱ्यावर आलेल्या राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत नाशिक जिल्ह्यातील कळवण येथे शेतकरी कृतज्ञता मेळावा पार पडला होता. त्यावेळी बोलतांना अजित पवार यांनी सोमवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत बैठक बोलावून सप्तशृंगी देवी संस्थानच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्याला मंजुरी देण्यात येईल, असे म्हटले होते.

त्यानुसार आज मंत्रालयात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली शिखर समितीची बैठक बोलविण्यात आली होती. या बैठकीत सप्तशृंगी देवी संस्थानच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्याला ८१ कोटी ८६ लाख रुपयांची मंजुरी देण्यात आली आहे. यावेळी नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांनी या तीर्थक्षेत्र विकासासाठी ८१.८६ कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर केला आहे. हा सुधारित आराखडा २५ कोटींपेक्षा अधिक असल्याने तो ग्रामविकास विभागाकडून नियोजन विभागाकडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. सुधारीत आराखड्यात स्वच्छतागृह बांधणे, डोम बसविणे, दरड कोसळण्यापासून संरक्षणात्मक जाळी बसविणे आदी विविध कामांचा समावेश आहे.

## शतकी स्वप्नपूर्ती

सात ऑक्टोबर २०२३ या दिवसाची भारतीय क्रीडा इतिहासात नक्कीच नोंद होईल. याच दिवशी भारताने आशियाई क्रीडा स्पर्धेत पदकांचा शतकी टप्पा पार केला. चीनमध्येच १९९०मध्ये झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला केवळ कबड्डीत सुवर्णपदक जिंकता आले होते. सन २००२च्या स्पर्धेत अवघी ३६ पदके मिळाली होती, ही या यशामागील पार्श्वभूमी आहे. या पार्श्वभूमीवर यंदा भारताने २०१८च्या स्पर्धेतील पदकसंख्येत पन्नास टक्क्यांहून जास्त वाढच केली नाही, तर सुवर्णपदकांच्या संख्येतही १६वरून २८पर्यंत प्रगती साधली.

गेल्या स्पर्धेत भारताने १८ क्रीडा प्रकारांत यश मिळवले होते, तर या वेळी २२ प्रकारांत. नेमबाजी, तिरंदाजी, बॅडमिंटन, टेबल टेनिस या खेळांत आशियाई स्तरावरील स्पर्धा जागतिक स्तराइतकीच उच्च असते; त्यामुळे या यशाचे महत्त्व वाढते. 'ऑलिम्पिक'मधील प्रमुख खेळ असलेल्या ॲथलेटिक्समधील २९ आणि नेमबाजीतील २२ पदकांचा मोलाचा वाटा सुखावतो; त्याच वेळी कुस्ती आणि बॉक्सिंगमध्ये पीछेहाट झाल्याची सल आहे. सात्त्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी जिकलेले बॅडमिंटनमधील सुवर्णपदक पॅरिस ऑलिम्पिकसाठी अपेक्षा उंचावणारे आहे. तिरंदाजीच्या कम्पाउंड प्रकारात धवल यश मिळाले. भारतीयांतच पदकासाठी झालेली स्पर्धा मन सुखावणारी होती. कम्पाउंड तिरंदाजीतील ओजस देवतळे आणि अभिषेक वर्मा यांच्यातील अंतिम लढत असो किंवा भालाफेकीत नीरज चोप्रा व किशोर जेना यांच्यातील सुवर्णपदकाची चुरस आनंददायक होती. त्याचबरोबर पारुल चौधरीने तीन हजार मीटर स्टीपलचेसमधील रौप्य जिंकताना प्रीती लांबावर केलेली मातही!


भारताचे हे यश 'खेलो इंडिया'तून पुढे येणारे गुणवान खेळाडू, केंद्र सरकारचे भक्कम आर्थिक पाठबळ यांचे आहे. भारतीय खेळाडूंना सातत्याने आंतरराष्ट्रीय स्पर्धांत सहभागाची, प्रशिक्षणाची संधी लाभते, याचे आहे. त्याचबरोबर खेळाडूंच्या पाठीशी भक्कम उभ्या असलेल्या, त्यांना चांगल्या सुविधा मिळण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचेही आहे. तिरंदाजीचे उदाहरण देता येईल. तिरंदाजी महासंघास २०२२-२३मध्ये २४ कोटी रुपयांचा निधी मिळाला. 'एनटीपीसी'बरोबर पाच वर्षांसाठी ११५ कोटी रुपयांचा करार झाला. दक्षिण कोरिया आणि इटलीतील प्रशिक्षक, मानसोपचारतज्ज्ञ, फिजिओ यांच्यावर दोन कोटी रुपये खर्च झाले, तर राष्ट्रीय शिबिरांसाठी तीन कोटी. याशिवाय ५० तिरंदाज प्रशिक्षकांना परदेशांतील शिबिरांचा अनुभव मिळाला. नीरज चोप्राला २०२४च्या पॅरिस ऑलिम्पिकच्या पूर्वतयारीसाठी १.४५ कोटी रुपये मिळणार आहेत. ही उदाहरणे लक्षवेधी आहेत. भारतीय खेळ म्हणजे केवळ क्रिकेट नव्हे. भारतात क्रिकेटचा 'वर्ल्ड कप' सुरू असतानाही 'एशियाड'मधील यशाची चर्चा मोठ्या प्रमाणावर झाली. समाजमाध्यमांवर त्याची दखल घेतली गेली, हे 'ऑलिम्पिक' खेळांना लाभणारा वाढता प्रतिसादच दाखवत होते. भारताच्या या यशाचे कौतुक करताना महिला कबड्डीतील सुवर्णपदक समाधान देणारे असेल; पण या खेळाची दखल आपण गेल्या स्पर्धेतील अपयशानंतर पहिल्यांदा घेतली, हे विसरता येणार नाही. भारतीयांना माहितीही नसलेल्या वुशू, सेपॅकटॅकरो या प्रकारांत पदके जिंकली. त्या खेळाडूंना मोलाचा पाठिंबा मिळाला; पण तीन वुशू खेळाडूंना केवळ अरुणाचल प्रदेशच्या असल्यामुळे 'एशियाड'ला मुकावे लागले, याचाही विसर नको. भारताने पदकांचे शतक गाठल्याचा डांगोरा किती पिटावा, याचेही भान बाळगायला हवे. चीनने दोनशे सुवर्णपदके जिंकली आहेत. पदकांची प्रगती लक्षात घेतानाच भारतीय पथकात साडेसहाशेहून जास्त खेळाडू होते, हे लक्षात घेऊन या यशाचा विचार करायला हवा. आशियाई स्पर्धेतील पदकविजेत्यांच्या कहाण्या आपल्याला बरेच काही करणे गरजेचे आहे, हेच सांगतात. रोइंग आणि सेलिंगमधील बहुतेक पदकविजेत्यांनी सैन्यदलात रुजू झाल्यावर या खेळांना सुरुवात केल्याचे सांगितले. याचाच अर्थ त्यांच्यात गुणवत्ता होती; पण ती त्यांच्या बालवयापासून नव्हे, तर तरुण वयात जोपासली गेली, याचा विसर नको. खेळाडूंना भक्कम आर्थिक पाठबळ लाभत असतानाच, ३५ किलोमीटर चालण्याच्या मिश्र दुहेरीत मंजू राणीच्या साथीने ब्राँझ पदक जिंकलेला रामबाबूने करोना काळात घर चालवण्यासाठी रोजगार हमी योजनेत रस्ता बांधणीचे काम केले होते. 'टॉप्स' अंतर्गत पदकासाठी साह्य मिळते, 'खेलो इंडिया'त चमकणाऱ्यांना शिष्यवृत्ती मिळते; पण अजूनही खेळाडूंचा शोध घेण्याची, त्यातून पदकविजेते घडवण्याच्या योजनेची अंमलबजावणी प्रभावी असल्याचे जाणवत नाही. खेळाडूंची संख्यात्मक वाढ झाली, की गुणात्मक वाढ होईल, याचा विचारही करायला हवा. पदकांचे शतक हे एक छोटेसे पाऊल आहे. 'अब की बार सौ पार' यशस्वी झाले याचे कौतुक करतानाच, 'मंझिल अभी दूर है' याचे भान जास्त हवे.

## आम्ही इतके व्यस्त आहोत की आमच्याकडे वेळ नाही

आजकाल आपण बरेचदा ऐकतो की आम्ही खूप व्यस्त आहोत, वेळ कुठे आहे?, असे विधान लोकांच्या ओठावर नेहमीच असते आणि ते सोशल मीडियावर अमूल्य वेळ वाया घालवून तिथे अपार आपुलकी दाखवतात, पण प्रत्यक्ष भेटायला त्यांना वेळ मिळत नाही. आधुनिकता आणि दिखाऊपणाच्या नादात आपण आपल्या संस्कृती, परंपरा, घर, कुटुंब, नातेसंबंध आणि प्रियजनांपासून फार दूर गेले आहोत. बाह्य सुखाच्या मृगजळात आपण आपल्याच आंतरिक आनंदाची होळी केली आहे. सुंदर, साधे आणि समाधानी जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन आता पूर्णपणे बदलला आहे. पैसा बघून लोक आता आदर दाखवतात. जे लोक लोकांच्या सुखात आनंदी असायचे ते आता ईर्षेने पेटू लागले आहेत आणि ज्या चेहऱ्यावर एकेकाळी निरागस हास्य असायचे त्या चेहऱ्यावर खोटे हास्य दिसू लागले आहे. सत्य, न्याय आणि चांगुलपणाऐवजी आता खोटे-वाईट झटपट व्हायरल होतात आणि अशाच अफवांचा बाजार सतत पेटत राहतो. मनोरंजनाच्या जगात अश्लीलतेला एक सभ्य आचरण समजून प्रोत्साहन दिले जात आहे आणि दुसरीकडे नैतिकता आणि ज्ञानाची उपेक्षा केली जात आहे. जरी शहरी लोक ग्रामीण लोकांपेक्षा अधिक सुखसोयींनी साधनसंपन्न आहेत, तरीही ते अधिक आजाराने ग्रासले आहेत. आपले शरीर आजारी करून, आपण हॉस्पिटलमध्ये मोठी बिले भरणार परंतु आपल्या प्रियजनांशी मन मोकळे करायला देखील वेळ नाही. जे करू नये, नेमके तेच आपण करत असतो, त्यामुळेच आपले आरोग्य झपाट्याने बिघडत आहे. सोशल नेटवर्क पब्लिक ॲप द्वारे केलेल्या संपूर्ण भारतातील सर्वेक्षणात असे दिसून आले आहे की ९०% भारतीय लोक मानसिक आरोग्याच्या समस्या वाढण्याचे कारण आधुनिक जीवनशैलीला देतात.

जागतिक मानसिक आरोग्य दिन दरवर्षी १० ऑक्टोबर रोजी जगभरात वेगाने वाढणाऱ्या मानसिक आरोग्याच्या समस्येबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी साजरा केला जातो. वर्ल्ड फाऊंडेशन ऑफ मेंटल हेल्थच्या नुसार या वर्षाची २०२३ ची थीम मानसिक आरोग्य एक सार्वत्रिक मानवी हक्क ही आहे. मानसिक आरोग्य हा एक मूलभूत मानवी हक्क आहे जो प्रत्येकाला, मग ते कोणीही असो किंवा ते कुठेही असो, मानसिक आरोग्याच्या सर्वोच्च प्राप्य मानकाचा अधिकार आहे. यामध्ये मानसिक आरोग्य धोक्यांपासून सुरक्षित राहण्याचा अधिकार, उपलब्धता, प्रवेश योग्यता, स्वीकार्यता, चांगल्या दर्जाच्या काळजीचा पूर्ण प्रवेश, स्वातंत्र्य आणि समाजात समाविष्ट यांचा समावेश होतो. जागतिक स्तरावर आठपैकी एक व्यक्ती मानसिक आरोग्य स्थितीसह जगत आहे, मानसिक आरोग्य समस्या किशोर आणि तरुणांवर वेगाने परिणाम करत आहेत. आज, मानसिक आरोग्य स्थिती असलेल्या लोकांना मोठ्या प्रमाणावर मानवी हक्कांच्या उल्लंघनाचा सामना करावा लागतो. अनेकांना घर, कौटुंबिक आणि सामाजिक जीवनातून वगळले जाते, भेदभाव केला जातो, अनेकांना मानसिक आरोग्य वैद्यकीय सेवेपासून वंचित ठेवले जाते, हे त्यांच्या मानवी हक्कांचे उल्लंघन आहे. डब्ल्यूएचओने मानसिक आरोग्याचे महत्व, प्रोत्साहन, संरक्षण आणि तातडीने निराकरण करण्याचे आवाहन केले आहे जेणेकरून प्रत्येकजण त्यांच्या मानवी हक्कांचा वापर करू शकेल आणि त्यांना आवश्यक असलेली गुणवत्तापूर्ण मानसिक आरोग्य सेवा मिळू शकेल.

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, नैराश्य हा एक सामान्य मानसिक विकार आहे. जगातील अंदाजे ७ पैकी १ किशोरवयीन मुलांमध्ये मानसिक विकार आहे. दरवर्षी ७००,००० हून अधिक लोक आत्महत्या करून जीव गमावतात. गंभीर मानसिक विकार असलेले लोक सामान्य लोकसंख्येपेक्षा १० ते २० वर्षे आधी जीव गमावतात. कमी उत्पन्न असलेल्या देशांमध्ये दर १००,००० लोकसंख्येमागे एकापेक्षा कमी मानसिक आरोग्य कर्मचारी आहेत, तर उच्च उत्पन्न असलेल्या देशांमध्ये ६० पेक्षा जास्त आहेत. नैराश्य आणि चिंतेमुळे दरवर्षी जागतिक अर्थव्यवस्थेच्या उत्पादकते मध्ये तोटा अंदाजे १ ट्रिलियन अमेरिकी डॉलर इतका आहे. कोरोना महामारीच्या पहिल्या वर्षात जगभरात चिंता आणि नैराश्याचे प्रमाण २५% वाढले. भारताचे वर्णन सर्वाधिक नैराश्यग्रस्त देशांपैकी एक म्हणून केले गेले आहे, देशात आत्महत्येचे प्रमाणही जास्त आहे. आता तर १०-१२ वर्षांचे शाळकरी लहान मुलांमध्ये देखील आत्महत्येचे प्रमाण दिसून येत आहे. २०२२ मध्ये मानसिक आरोग्यासाठी एकूण आर्थिक आरोग्य बजेटपैकी फक्त ०.८% तरतूद करण्यात आली होती. आपली जीवनशैली, यांत्रिक संसाधने, प्रदूषण, वागणूक, लोभीवृत्ती आणि असंतुलित दैनंदिन दिनचर्या यामुळे आपण आजारी आहोत. भौतिक सुख कधीच आत्मिक आनंदाची जागा घेऊ शकत नाही, तरीही आपण त्याच्या मागे धावत आहोत आणि मानसिक शांतता आणि आनंद गमावत आहोत. जगात अनेक असे श्रीमंत लोक आहेत जे आपले वैभव सोडून निसर्गाच्या सानिध्यात सामान्य जीवन जगतात कारण त्यांना त्यामुळे मानसिक शांतता मिळते. आजच्या काळात, मानसिक विकार वाढण्यास आपण स्वतःच सर्वात जास्त जबाबदार आहोत, कारण आपण स्वतःला नकारात्मक विचारांनी घेरले आहे. सहिष्णुता, परिश्रम आणि जागरूकता यांचा अभाव, रात्रंदिवस वाईट विचार, चुकीच्या खाण्या-पिण्याच्या सवयी, दुसऱ्यावरचा अतिविश्वास, दूरदृष्टीचा अभाव, दिखाऊपणा, वाईट लोकांची संगत यामुळे आपली विचारसरणी बिघडली आहे. लोकांमधील सहिष्णुता इतकी संपली आहे की, जर एखाद्याला चुकीचे काम करण्यापासून रोखले तर तो आपल्यालाच मारायला तयार होतो आणि छोट्या-छोट्या गोष्टींवर भान हरपतात. केवळ पालकांनी रागावल्याने मुले अनुचित पावले उचलू लागतात. तरुणांमध्ये अंमली पदार्थांचे व्यसन, सोशल मीडियाचे व्यसन आणि गुन्हेगारी सातत्याने वाढत आहे. मूल्यांची खुलेआम पायमल्ली केली जाते. आज अनेक पालकांना आपली मुलं कुठे जात आहेत, कोणाला भेटतात, आपला वेळ कुठे घालवतात हेच माहीत नाही. पालक आपल्या मुलांना आवश्यक पोषक वातावरण देत आहेत का? शेवटी, आपण इतके व्यस्त आहोत की आपल्याजवळ स्वतःसाठी किंवा आपल्या मुलांच्या उत्तम संगोपनासाठी वेळ नाही. गैरवर्तन आणि मतभेद यामुळे तणाव निर्माण होतो. आपल्या जबाबदाऱ्या योग्य पद्धतीने न पार पाडल्याने भविष्यात समस्या निर्माण होतात, ज्यामुळे मानसिक आरोग्याचे विकार वाढतात. लोक इतके व्यस्त दिसतात की वर्षानुवर्षे एकाच परिसरात राहूनही जुन्या ओळखीच्यांना किंवा मित्रांना भेटता येत नाही. लोकांच्या मोठमोठ्या गोष्टी हृदयातील अंतर वाढवतात. अहंकार आणि द्वेषाने लोकांना व्यस्त ठेवले आहे अन्यथा प्रत्येकाकडे वेळ आहे, फक्त तुमच्याकडे लोकांना भेटण्यासाठी प्रबळ इच्छाशक्ती असणे आवश्यक आहे. कोणत्याही कामाशिवाय निस्वार्थपणे कोणाला भेटायला वेळ काढणे आता दुर्मिळ झाले आहे. रक्तदान आणि अन्नदानाप्रमाणेच आजच्या काळात वेळ दान हे देखील अत्यंत महत्त्वाचे दान बनले आहे. प्रत्येकाने इतरांसाठी वेळ काढायला शिकले पाहिजे. मानसिक आरोग्य राखणे खूप सोपे आहे, आपल्याला फक्त आपल्या व्यस्त जीवनशैलीत काही बदल करावे लागतील. दररोज स्वतःसाठी देखील वेळ काढायला शिका, सकारात्मक विचार असलेल्या लोकांशी संपर्क साधा, नशा आणि खोटा देखावा टाळा, पौष्टिक आहार घ्या, रोजचा व्यायाम आणि पुरेशी झोप महत्त्वाची आहे. भावनिक आणि रडण्याच्या सिरियल्समुळे मेंदूला त्रास होतो, अशा सिरियल्स मानसिक शांतता भंग करतात. मुलांना सुसंस्कृत आणि उत्तम नागरिक बनवणे ही पालकांची जबाबदारी आहे. आपल्या जबाबदाऱ्या चांगल्या प्रकारे पार पाडा. ज्येष्ठांचा आदर करा आणि निरोगी दैनंदिन दिनचर्या राखा. आपल्यामुळे कोणाचेही नुकसान होऊ नये, नियमांचे प्रामाणिकपणे पालन करा. नेहमी मानवतेच्या मार्गाने जगा. निसर्ग आणि प्राणी-पक्षींचे संरक्षण करा. आपल्यात एखादा चांगला छंद किंवा चांगली सवय असेल तर ती आपण कधीही सोडू नये. आपल्या प्रियजनांना भेटा, हसत-खेळत राहा, आयुष्य मोकळेपणाने जगा. आपलं आयुष्य खूप छोटं आहे, समाधानी बनून तणावमुक्त जीवन जगा. मानसिक आरोग्य समस्या असल्यास निसंकोचपणे त्वरित मदत मिळवा. भारताच्या राष्ट्रीय टेली मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत ही एक व्यापक मानसिक आरोग्य सेवा आहे. समुपदेशकाशी संपर्क साधण्यासाठी हा टोल फ्री नंबर १४४१६ किंवा १-८०० ८९१ ४४१६ डायल करू शकता. भारत सरकारच्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ ॲंड न्यूरोसायन्सेसद्वारे चालवल्या जाणाऱ्या मानसिक आरोग्य सेवांसाठी हा २४७ टोल फ्री हेल्पलाइन क्रमांक ०८० - ४६११ ०००७ आहे. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेंटल हेल्थ रिहॅब हेल्पलाइन क्रमांक १८०० ५९९ ००१९ उपलब्ध आहे. याशिवाय अनेक संस्था आणि एन.जी.ओ. मानसिक आरोग्याशी संबंधित सेवांसाठी २४ तास उपलब्ध आहेत, त्यांच्याशीही संपर्क साधू शकतो.



(जागतिक मानसिक आरोग्य दिन विशेष - १० ऑक्टोबर २०२३)



डॉ. प्रितम भी. गेडाम
मो.०८२३७४ १७०४१

## मिशन राणीगंज एक सत्य घटना


राणीगंज एका सत्य घटनेवर आधारित फिल्म आहे, ज्यात प्रमुख भूमिकेत अक्षय कुमार आणि परिणीती चोपडा असून चित्रपटाची कथा एका खाणीत काम करणाऱ्या मजुरांची आहे जे एक दिवस खाणीत काम करताना फसून जातात आता त्यांना वाचायचं कसं असा प्रश्न खाणीचे मालक व इतरांना पडतो परंतु त्या कामाचा इंजिनिअर असणारा अक्षय कुमार हा एक प्लांन सुचवतो पण त्याचे वरिष्ठ ऐकत नाही परंतु अक्षय त्यांना समज देऊन मंजुरी मिळवतो आता त्या अटकलेल्या मजुरांना खाणीतून अक्षय कसा वाचवणार त्याला त्यासाठी कोणकोणत्या अडचणी येणार या सर्व गोष्टीं तुम्हाला चित्रपट बघितल्यावरच कळेल चित्रपटाची कथा तर चांगलीच आहे कारण सत्य घटनेवर आधारित आहे शिवाय पटकथा देखील उत्तम आहे बारीक बारीक गोष्टीचा सुरेख वापर या चित्रपटात दिसून येतो सोबतच संवाद एकदम आपलेसे वाटतात जी या चित्रपटात गरजेचे होते कुठल्याही चित्रपटाचा सीन तेव्हाच उत्तम होतो तेव्हा दिग्दर्शन आणि सोबतच पार्श्वसंगित भक्कम असेल या चित्रपटात ते दिसून येत या चित्रपटात पार्श्व संगीत उत्तम असून चित्रपटाचा एक एक सीन अंगावर शहारे आणणारा आहे अभिनयाबद्दल बोलणं झालं तर अक्षय परिणीतीने आपल्या वाटेला आलेली भूमिका छान केली आहे शिवाय ही भूमिका फक्त अक्षय शिवाय दुसरा कोणीच करू शकत नाही असं दिसून येतं त्यासह अन्य कलाकारांनी आपल्या वाट्याला आलेली भूमिका छान साकारलीय जे खाणीत फसले आहेत त्या कलाकारांच्या भावना इमोशन दिसून येतात तर जे खाणीच्या बाहेर आहेत त्यांची धावपळ अभिनयातून दिसून येते दिग्दर्शन सुद्धा अप्रतिम झाल आहे कारण खाणीमध्ये शूट करताना एक एक सीन प्रेक्षकांना कसं बांधून ठेवेल याकडे जास्त गांभीर्याने लक्ष दिलेलं दिसून येतं. एकूणच एक थरार या चित्रपटात आहे छोटे छोटे घडामोडी चित्रपट बघताना आपल्याला बांधून ठेवतात एक सत्य घटना वर आधारित फिल्म पुढे काय होणार ही उत्सुकता वाढवून ठेवण्यात यशस्वी ठरते अक्षय कुमार या चित्रपटासह पुन्हा एकदा सरदाराच्या भूमिकेत प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यात यशस्वी ठरेल यात शंका नाही







### शब्दकोडे-२००



**आडवे शब्द**

१. होळी २. महासर्प ७. उदबत्ती ११. कूर्म, कवचधारी प्राणी १२. जमलेला घोळका १३. पार्वती १४. रात्रभर १६. किल्लेदार १८. पंख १९. द्रव्य २०. लोणी २२. बोकड २३. चंद्र २४. एक नक्षत्र २५. कानाजवळचा भाग २६. अडखळत बोलणारा २८. दहावी रास ३०. एक जंगली क्रूर प्राणी ३२. लोक, प्रजा ३३. अंतःकरण ३५. तुकडी, पान ३६. हवाई अड्डा ३८. कसेतरी, अनिच्छेने ४१. काळ्या तोंडाचे माकड ४३. मस्ती, जोम ४४. उणीव ४६. रागावणे ४८. टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास ५२. आघात, वार ५३. इतर ५४. खवा ५५. व्रत ५७. वर्तमानपत्रातील कप्पा ५९. बारा वर्षांचा काळ ६०. शत्रूच्या नाशाचे मंत्रतंत्र ६२. निराश ६४. व्यवस्था, काम पाहणे ६८. संगत, बरोबर ६९. थेट, सरळ ७०. मर्यादा ७२. डोळे ७३. सूर्याचे एक नाव ७४. कोवळी फांदी ७६. कबूतर ७७. मनाचा झालेला ग्रह ७८. तुरुंग ७९. चटकन ८०. समुद्र

**उभे शब्द**

१. पारध २. चामखीळ ३. गावठी ४. ऐनवेळी माघार घेणे ५. हत्ती ६. श्री विष्णूचे एक नाव ८. पक्षांचा राजा ९. शेळी १०. पाच वर्षांच्या आतील मुलगा १३. जन्मतः १५. आवाज, गोंगाट १६. श्रीगणेशाचे एक नाव १७. जास्तीत जास्त व कमीत कमी १९. हिंमत २१. बेचव, रुचीहीन २२. पुष्कळ २३. शंकराचा वार २५. अंजन २७. राजाची पत्नी २९. संथपणे, इकडे तिकडे पाहत ३१. चांदी ३४. बोटावरील कडक आवरण ३५. किंमत ३६. लग्न ३७. मानवी कत्तल ३९. भीती ४०. दुप्पट (इंग्रजी) ४२. सापाची एक जात ४४. दार ४५. दालचिनी ४७. तारकांचा स्वामी, चंद्र ४९. अटीची भाषा ५०. एक श्वासरोग ५१. अल्पप्रमाण, थोडे सुद्धा ५३. कोणीतरी एक, परका ५६. तात्पर्य ५८. घोषणा ६१. खोडण्याचे साधन ६३. स्वर्गाचे दोन पहारेकरी ६५. रडगाणे ६६. निरर्थक, --- कथा ६७. एक खनिज द्रव ६८. लहान ७०. पाळलेले, माणसाळलेले ७१. दिवस (सं.) ७२. बाज विणण्याची कापडी पट्टी ७३. दारूचा एक प्रकार ७५. कष्ट, त्रास ७६. घोडे बांधण्याची जागा ७७. पावसाची झड

### शब्दकोडे १९९ चे उत्तर


**आडवे उत्तर**

१.तोच चंद्रमा नभात तीच चैत्र यामिनी १०.व्यथा ११.रग १२.रात्र १४.भान १५.माती १६.नीच १७.विनाकारण १९.दिन २०.यक्ष २१.रसना २३.साल २४.राज २६.अवाजवी २९.महाराष्ट्र नवनिर्माण सेना ३१.हर ३२.सर्कस ३३.गीता ३४.नाक ३५.रग ३६.इतपत ३७.तोटा ३८.लठ्ठ ३९.तरतरीत ४०.तारा ४१.धनी ४३.राजा शिवाजी ४५.यथातथा ४७.तपास ४९.गज ५१.पर ५२.रम्य ५३.कसेल त्याची जमीन ५६.जम ५८.टवाळ ६०.सामना ६१.गर ६२.तमाशा ६३.फराळ ६४.पाप ६५.गदारोळ ६६.आपुलकी ६७.सर्वत्र ६८.हर ६९.आजी ७०.जस्त ७१.रमणी ७२.मौन ७३.परवा

**उभे उत्तर**

२.चलन ३.द्रव्यहीन ४.माथा ५.भारतीय जनता पक्ष,शिवसेना ६.तग ७.चराचर ८.चैत्र ९.यातना १३.घण १७.विना १८.काजवा २२.सहाण २३.साहस २४.राष्ट्रगीत २५.अनिल २६.अनाकलनीय २७.हजर २८.वीरगती २९.मसलत ३०.सेना ३६.इतराजी ३७.तोरा ३९.तळतळाट ४०.ताजी ४२.खातरजमा ४४.मगज ४६.थाप ४८.सरळ ५०.जमीनदार ५३.कमळ ५४.त्यागपत्र ५५.चीर ५७.मशालजी ५९.वास्तपुस्त ६०.सारा ६२.तळ ६३.फकीर ६४.पार्वती ६५.गहन ६६.आज ६९.आवा

## सोभाव (सुत्र १५)
## चंचलपना हाई ईकऋतई शे.



डॉ.रा.प्र.पारनेरकर

मानूसना चंचलपना हाई मननी प्रकृती नै ती एक ईकृती शे .पन मनना धर्म मातर चलाख शे. चलाख आनी समोरना काय या दोन्ही काम एकच शे. त्या दोन्ही एकमेकना चांगला सहकारी शेतस. तेव्हढच नै ते त्या दोन्ही एकमेकना परोपकारी शेतस. त्या दोन्ही म्हा जो एकसारखापना शे. जर तो -हाता नै ते जग आनी जीवन म्हनजेच मानूसना सोभाव ह्यानं काई सोरुप बिन तआबआनंन घडत जातं.पन काल हाऊ सोताना गती मा पुढे जास तसं मनन नै. मन चल -हास तरी त्यानी गती स्थिर अशी -हात नै. त्यामुये कारनं आनी मनन गंधित एकत्र जउळवनं भलतच कठीन काय शे.मनन आनी कालन गनित जुडवन म्हन्जे जीवनमा यश आनी परिस्थितीवर मात करानी शे. कालनी गती हाई मानूसना हातम्हा नै.पन मननी गती मात्र सोताना हातमा शे.ती कालशी जुडती करनं खूपच गरजनं-हास.पन त्यानी जानीव व्हवाले जोयजे.त्या करता सोताले धडपड करनारा या थोडासा शेतस. काल वय पुढं चालन आनी मंग मांगे रेगाडत राहनारा असा उदाहरने समजा म्हा गनच देवाले भेटथीन.काही हासा सारखा ठरनारा उदाहरने बी आपून देखथस. हाऊ असाच मानूसना सोभाव मधला मोठा दोष शे. मन मांगे रेगांडत नै ना यांनी खबरदारी लेन खूप गरजन -हास.जस मन मांगे रेगांडत तसं तसं खूप दाव कालन बी पुढं पयताना दिखस.पन रेगांडन जसा हाऊ त्याना दोस शे तसचं पढे पयन हआऊसध्दआ त्याना मोठा दोष शे. साठी बुद्धी नाठी अशी जी म्हन वापरास त्याना मांगे रेगांडत वाचन करस. ते अकाली वृद्धत्व आदरताए धरडपन हाऊ वाक्प्रचार पुढे पयनं दखआडस. मन हाई काल ना मांगे नै ते पुढे रआयनं हाई काही चांगली गोष्ट नै शे.काल आनी मन ह्यासन सहकार्य असन नै ते निरमान करनं यानच जून नाव भाषामा धर्म चलन नै ते धर्म पालन आस शे. काल परमाने आपलं मनले लेनारा तो एक शहाना -हास. त्याना करता तप यानासाठीच करन पडस.काल आनी मन ह्यासन साहचर्य घडआईन आनंन हाई खूप कालपर्यंत चालनारी घटना शे. मन या गोष्टी सन शिक्शन कोनले मियत नै.आनी या गोष्टी सनी जानीव ठेवनारा कोनी फारसा दिखत नै.मन चंचल नै पन ते चल शे.काल हाऊ चल -हावामुयेच मन हाई बी चल ठएवनं गरजन शे.मनले कालपरमाने चल ठेवान काम ईश्र्वरन देवनं नै ते निसर्गन हाई करेल शे. पन त्याना कालशी मेय मिलाप घालावं काम जे मानूसनच शे ते काम मानूस करत नै. तो का करत नै यानं मुख्य कारनं त्याले या गोष्टी सनी अक्कलच -हात नै.हाई अक्कल मानूसले सोताना सोताले लेनी पडीन.मानूस सोताले सोता आपला ईषय कधीच करत नै. तसा अभ्यास करत नै.त्यामुये आज मानूसले जगनं जेवढी अक्कल शे तेव्हढच अज्ञान त्याना सोताईषयी त्याना ठिकानेच नांदस.

**– प्रा.भगवान पाटील. अध्यक्ष, अहिरानी साहित्य परिषद धुळे**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# ज्येष्ठ नागरिकांना मिळावी सन्मानपूर्वक वागणूक : दिनकर पाटील यांचे आवाहन

## लोकज्योती मंचच्या आनंद मेळाव्यात २१० ज्येष्ठांचा अमृतमहोत्सव सोहळा





नाशिक । प्रतिनिधी

कौटुंबिक पातळीपासून तर सामाजिक स्तरावर ज्येष्ठ नागरिक आपल्या अनुभवातून उचित मार्गदर्शन करत असतात. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर प्रोत्साहन देण्याचे कार्य ज्येष्ठ करत असून समाजाची थिंक टँक म्हणून ते सदैव तत्पर असतात. आमुलाग्र योगदान देणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना सन्मानपूर्वक वागणूक मिळायला हवी, असे आवाहन नाशिक महापालिकेचे माजी सभागृहनेते दिनकर पाटील यांनी केले.

लोकज्योती ज्येष्ठ नागरिक मंच नाशिक यांच्या वतीने नविन नाशिक परिसरातील जेष्ठ नागरिक संघांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठांचा आनंद मेळावा कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी माजी नगरसेविका

यांच्यासह लोकज्योती जेष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष रंजन शाह, जितेंद्र येवले, देवराम सैदाणे आदी उपस्थित होते.

### गाण्यांवर ज्येष्ठांनी धरला ठेका

**कृतार्थ संगीत मंचच्या गायकांनी उपस्थित जेष्ठ नागरिकांना गाण्यांवार ठेका धरण्यास भाग पाडले. सिद्धिविनायक हास्य क्लब आयोजित दिलीप शेवाळे, विजय मेखे, संजय मालपुरे व सहकाऱ्यांनी बम बम भोलेचा अप्रतिम डान्स सादर केला. आनंद मेळाव्यामध्ये ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांचा अमृत महोत्सव सत्कार करण्यात आला. उल्लेखनीय कामगिरी केलेल्या ज्येष्ठ नागरिकांनाही सन्मानित करण्यात आले. कृतार्थ संगीत ग्रुपतर्फे सुरेल गाण्यांचे सादरीकरण यावेळी झाले. मनोरंजनात्मक कार्यक्रमाने उपस्थित ज्येष्ठ नागरिक भारावून गेले होते.**

दिनकर पाटील पुढे म्हणाले, धार्मिकता जोपासतांना आजवर अनेक मंदिरांच्या उभारणीत सहकार्य केलेले आहे. त्याप्रमाणे लोकप्रतिनिधी म्हणून कार्यरत असतांना नेहमीच ज्येष्ठ नागरिकांच्या हिताची भूमिका घेण्याचा प्रयत्न असतो. यापुढेही ज्येष्ठांना सर्वोत्परी सहकार्य करतांना महापालिका, शासनस्तरावर पाठपुरावा करुन जास्तीत-जास्त लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला जाईल. ज्येष्ठ नागरिकांनी केव्हाही हक्काने संपर्क साधल्यास नेहमीच त्यांची मदत करेल. इतर नगरसेवक, लोकप्रतिनिधी यांनाही यानिमित्त ज्येष्ठ नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन करेल. उपक्रमाला दिलेल्या प्रतिसादाबाबत ज्येष्ठ नागरिकांचे आभार मानतांना शहरातील इतर विविध भागांमध्येही आनंद मेळाव्याचे आयोजन केले जाणार असल्याची महत्त्वाची घोषणा त्यांनी केली.

प्रा. रमेश डहाळे म्हणाले, ज्येष्ठ नागरिकांच्या हिताचे अनेक कायदे अस्तित्वात आहेत. या कायद्यांबाबत ज्येष्ठ नागरिकांमध्ये जागृकता निर्माण केली पाहिजे. त्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी समाजाने एकजूटीने ज्येष्ठ नागरिकांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे.

मान्यवरांसह उपस्थितांचे स्वागत जितेंद्र येवले यांनी केले. प्रास्ताविकात देवराम सैंदाणे यांनी उपक्रमांची माहिती दिली. सूत्रसंचालन कवी रविंद्र मालुंजकर यांनी केले. जितेंद्र येवले यांनी आभार मानले. उपक्रमासाठी नवे नाशिक ज्येष्ठ नागरिक संघ, श्री समर्थ जेष्ठ नागरिक संघ, जगदंब जेष्ठ नागरिक संघ, गोविंदनगर जेष्ठ नागरिक संघ, न्यू जगदंब जेष्ठ नागरिक संघ, श्री साई समर्थ जेष्ठ नागरिक संघ, श्री सिद्धेश्वर मंदिर परिसर जेष्ठ नागरिक संघ, संकट मोचन जेष्ठ नागरिक संघ, ओम कॉलनी जेष्ठ नागरिक संघ यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमासाठी बाळासाहेब पवार, नानाजी अहिरे, बापू अमृतकर, किसनराव खताळे, प्रकाश महाजन, जगन्नाथ कुऱ्हे, रघुनाथ कुमावत, वसंतराव जाधव, भालचंद्र रत्नपारखी, संपतराव मुसळे, रामनाथ गंभीरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# ‘गझल विश्वास’ विश्वास ग्रुपतर्फे शनिवारी ‘गझल रजनी’

नाशिक । प्रतिनिधी

आज महाराष्ट्रात विविध आशय विषयांचे वेगळेपण घेऊन गझल लिहिली जात आहे. अनेक नवे गझलकार गझल लेखनाची परंपरा समृद्ध करत आहेत, पुढे नेत आहेत. मराठी गझलेला एका ठराविक साचेबद्धतेच्या पलीकडे घेऊन जाण्यात महत्वाचे योगदान देत आहेत. त्या सर्वांना एका व्यासपीठावर आणण्याचा ‘गझल विश्वास’चा प्रयत्न आहे. त्याचाच एक भाग म्हणजे ‘गझल रजनी’ होय. विश्वास ग्रुप, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, शाखा जलालपूर व गझलपुष्प कला, साहित्य, सांस्कृतिक, सामाजिक संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ‘गझल रजनी’ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

विश्वास ग्रुपचे कुटुंबप्रमुख विश्वास जयदेव ठाकूर यांची संकल्पना असून, आयोजक विश्वास ज्ञानप्रबोधिनी अ‍ॅण्ड रिसर्च इन्स्टिट्युटचे सचिव विनायक रानडे व रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओच्या समन्वयक ऋचिता ठाकूर आहेत तर समन्वयक संजय गोरडे आहेत. गझल रजनी मैफिलीसाठी ‘गझलपुष्प’ कला, साहित्य, सांस्कृतिक, सामाजिक संस्था पुणेचे अध्यक्ष संदिप जाधव यांचे सहकार्य लाभले आहे. क्लब हाऊस, ठाकूर रेसिडेन्सी, विश्वास को-ऑप. बँकेसमोर, सावरकरनगर, गंगापूर रोड, नाशिक येथे शनिवार, दि. १४ आक्टोबर २०२३ रोजी रात्री ८ वाजता मैफीलीची सुरूवात होणार असून रविवार, दि. १५ ऑक्टोबर २०२३ रोजी सकाळी ६ वाजेपर्यंत ही मैफल रंगणार आहे. गझल विश्वासचे हे दहावे पुष्प आहे. अधिक माहितीसाठी व सहभागी होण्यासाठी अभिजीत काळे (मो.९८५०६९०५९७), संजय गोरडे (मो.७२७६०९१०११) यांच्याशी संपर्क साधावा.

सदर कार्यक्रमास विश्वास को-ऑप. बँक लि., नाशिक, विश्वास ज्ञान प्रबोधिनी अ‍ॅण्ड रिसर्च इन्स्टिटयुट, नाशिक, रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ, विश्वास टर्फ, ग्रंथ तुमच्या दारी यांचे सहकार्य लाभले आहे. तरी या मैफीलीस जास्तीत जास्त गझलकारांनी सहभागी होण्याचे आवाहन विश्वास जयदेव ठाकूर, विनायक रानडे, ऋचिता ठाकूर, समन्वयक संजय गोरडे व संदीप जाधव यांनी केले आहे.

## विलास सावजी यांचे निधन

**नाशिक ।** भाजपा प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी यांचे ज्येष्ठ बंधू विलास वासुदेव सावजी (वय ७८) यांचे शनिवारी सायंकाळी अल्पशा आजाराने निधन



झाले. नाशिक अमरधाम येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी माजी आमदार व भाजपाचे दिंडोरी लोकसभा प्रमुख बाळासाहेब सानप, निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे, डॉ. उमेश मराठे, संभाजी मोरूस्कर आदींनी श्रद्धांजली वाहिली. त्यांच्या अंत्ययात्रेत भाजपा नाशिक महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव, सरचिटणीस सुनील केदार, काशिनाथ शिलेदार, योगेश भगत, महेश हिरे, अभय छल्लानी, योगेश चौधरी यांच्यासह नाशिक व जिल्ह्यातील उद्योजक, उद्योजक संस्थांचे पदाधिकारी, सर्वच राजकीय पक्षांचे नेते, माजी नगरसेवक , सामाजिक शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर तसेच नातेवाईक, भाजप शहर जिल्हा व प्रदेश पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ते एस.टी. महामंडळातील निवृत्त अधिकारी होते. त्यांच्या पश्चात सहा भावंडे, दोन बहिणी, दोन मुली, जावई, मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे.

प्रोसेस पेड | अ‍ॅड. आर व्ही. बावीस्कर
निशाणी नं.- ६

**जाहिर नोटीस**

**साक्री येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब क.स्तर सो. यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज. नं.२४८/२०२३**

१) श्री. संजय सिताराम पगारे, वगैरे- ..**अर्जदार**

**।। विरुध्द ।।**

**कोणीही नाही** ... **जाबदेणार**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशिप सर्टीफिकेट) मिळणेसाठी मे. दिवाणी न्यायालय क.स्तर साक्री येथे दि. ०४/०८/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की, अर्जदार नं. १ ते ४ यांचे वडील नामे कै. सिताराम विक्रम पगारे, यांचे दिनांक १०/८/२०२० रोजी मौजे पिंपळनेर, ता. साक्री जि. धुळे येथे निधन झाले आहे. तसेच मयताच्या मृत्युसमयी त्यांचे खालील प्रमाणे वारस आहेत.

वारसांची नावे
नाते / संबंध
१. श्री. संजय सिताराम पगारे - मुलगा
२. सौ. देवकाबाई रामदास देशमुख - मुलगी
३. सौ.सुनंदाबाई सुभाष रायते- मुलगी
४. श्री. भगवान सिताराम पगारे - मुलगा

मयतास वरील प्रमाणे वारस असुन यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही. खात निहाय शासकीय मदत मिळणेसाठी वारस दाखल आवश्यक असल्याने वरील वारसां व्यतीरीक्त इतर कोणाचा यारस हक्क असल्यास त्यांना सदर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील वारसांव्यतीरीक्त कोणाचा काहीही हक्क अधिकार असल्यास त्यांनी साक्री येथील मे. दिवाणी न्यायाधिश क. स्तर यांचे न्यायालयात दि. २०/११/२०२३ रोजी स्वतः अगर वकीलांमार्फत हजर रहावे वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाची सहि शिक्क्यांनिशी प्रसिध्दीस दिली असे.

**कामगिरी कारकुन दिवाणी न्यायालय कोर्ट साक्री** (शिक्का) **सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय, साक्री**

# विस्तार अधिकारी (सांख्यिकी) पदासाठी १ हजार १३ परीक्षार्थींनी दिली परीक्षा

नाशिक । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या निर्देशानुसार जिल्हा परिषदेच्या वतीने काल विस्तार अधिकारी (सांख्यिकी) या पदासाठीची परीक्षा ही ७ परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरळीत पार पडली. विस्तार अधिकारी (सांख्यिकी) या पदासाठी १२८१ परीक्षार्थी पैकी १०१३ परीक्षार्थी परीक्षेसाठी उपस्थित होते तर २६८ गैरहजर होते.

ग्रामविकास विभागाच्या निर्देशानुसार जिल्हा परिषद पदभरतीतील ८ पदांसाठी नियोजित वेळापत्रकानुसार परीक्षा ही घेण्यात येत आहे. त्यानुषंगाने काल विस्तार अधिकारी सांख्यिकी या पदासाठी परीक्षा ही पार पडली. नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी सर्व परीक्षा केंद्रांना भेटी देऊन पाहणी करून उपस्थित अधिकारी यांच्याकडून परीक्षा सुरळीत सुरू असल्याबाबतची माहिती घेतली. उपमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र परदेशी यांनी देखील सर्व परीक्षा केंद्रांना भेटी दिल्या.

सर्व परीक्षा केंद्रांवर मोबाईल जॅमर यंत्रणा कार्यान्वित असल्याबाबतची खात्री ही जिल्हा परिषद प्रशासनामार्फत करण्यात येत होती, त्याचबरोबर काही परीक्षा केंद्रांवर काल झालेल्या परीक्षा केंद्रांवर अस्वच्छता असल्याबाबतच्या तक्रारी या जिल्हा परिषद प्रशासनाला प्राप्त झाल्या होत्या त्यानुषंगाने सर्व परीक्षा केंद्रांवर स्वच्छता करण्याबाबतच्या सूचना या उपमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र परदेशी यांनी दिल्या होत्या.

पोलीस आयुक्त यांच्या आदेशानुसार शहरी भागातील परीक्षा केंद्रांवर व ग्रामीण भागात पोलीस अधीक्षक यांच्या सूचनेनुसार पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या माध्यमातून सर्व परीक्षा केंद्रांवर रुग्णवाहिकेची व्यवस्था करण्यात आली होती. अंजनेरी येथील परीक्षा केंद्रावर परीक्षा सुरू असताना विद्युत पुरवठा खंडित झाल्यानंतर अधीक्षक अभियंता विद्युत यांनी तातडीने विद्युत पुरवठा सुरळीत केला.

# मुंबई प्रदेशाध्यक्ष समीर भुजबळांच्या वाढदिवसानिमित्त युवक राष्ट्रवादीतर्फे भव्य सत्कार



### दोन किलो चांदीची तलवार, शाल देत केला सत्कार

नाशिक । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे मुंबई प्रदेशाध्यक्ष समीर भुजबळ यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष अंबादास खैरे यांनी सोनचाफा पुष्पहार घालून दोन किलो चांदीची तलवार, शाल व पुष्पहार घालून भव्य सत्कार केला.

माजी खासदार समीर भुजबळ यांच्या वाढदिवसानिमित्त सर्वसामान्य नागरिकांपासून ते राष्ट्रीय स्तरावरील प्रमुख नेत्यांनी त्यांचे अभीष्टचिंतन केले. मुंबई मधील स्व.यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथील सिंहगड कार्यालयात अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. वाढदिवसानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. विशेषतः नाशिक मधील पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी येऊन भव्य सत्कार केल्याने उत्साहाचे वातावरण होते. यावेळी युवक जिल्हाध्यक्ष योगेश निसाळ, चेतन कासव, शहर पदाधिकारी अमोल नाईक, संदीप गांगुर्डे, संतोष भुजबळ, संदीप खैरे, हरीश महाजन, रोहित पाटील, अक्षय गांगुर्डे, विशाल नाईक, अमर जगताप, प्रज्योत सुरवाडकर, आकाश म्हस्के, शुभम महाजन, सचिन आहेर, जयेश पिंपळीसकर, भूषण बागुल आदींसह मोठया संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## अ.भा. महात्मा फुले समता परिषदेतर्फे सत्कार

नाशिक । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे मुंबई प्रदेशाध्यक्ष माजी खासदार समीर भुजबळ यांच्या वाढदिवसानिमित्त अ. भा. महात्मा फुले समता परिषदचे प्रदेश उपाध्यक्ष दिलीप खैरे यांनी शाल व पुष्पहार घालून सत्कार केला.

माजी खासदार समीर भुजबळ यांचे मुंबई मधील स्व.यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथील सिंहगड कार्यालयात अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बाळासाहेब कर्डक, रविंद्र पगार, कविता कर्डक, अंबादास खैरे, हरीश महाजन, नाना पवार, योगेश निसाळ, डॉ योगेश गोसावी, अमोल नाईक, आकाश कदम, ज्ञानेश्वर महाजन, संतोष भुजबळ, सुभाष राऊत, अनिल नले, प्रसाद सोनवणे, अशोक पाटील, संदीप गांगुर्डे, संदीप खैरे, आकाश खोडे, दुर्गेश चित्तोडे, अक्षय गांगुर्डे आदींसह मोठया संख्येने समता सैनिक उपस्थित होते.

प्रोसेस पेड | अ‍ॅड.राकेश अशोक मोरे
निशाणी नं.- ६

**जाहिर नोटीस**

**धुळे येथिल मे.दिवाणी न्यायाधिश सो क.स्तर यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज. नं.११८६/२०२३**

१. खलील बिस्मिल्ला पिंजारी (मुलगा)
रा. प्लॉट नं. १७/अ, सर्व्हे नं. ४५०, चाळीसगांव रोड, समर्थ कॉलनी, आयशा मस्जीद जवळ, धुळे.
२. अकबर बिस्मिल्ला पिंजारी (मुलगा)
रा. घर नं. १२६३/बी/१०१/ए, संगम अपार्टमेंन्ट, आग्रा रोड, मिल्लत नगर २, फरहान खान हॉल, भिवंडी, ठाणे.
३. जुलेखा शबुदिन पिंजारी (मुलगी)
रा. टेंभा रोड, पिंपळनेर, ता साक्री, जि. धुळे.
४. जमिला शकिल पिंजारी (मुलगी)
रा. प्लॉट नं. ३९, अजमेरा शाळेच्या पाठीमागे, धुळे,
...**अर्जदार**

**।। विरुध्द ।।**

**कोणीही नाही** ... **सामनेवाला**
कै. न्यामत बी बिस्मिल्ला पिंजारी ...**मयत**

**उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळणेसाठी**
(Succession Certificate)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी त्याचे वडील मयत न्यामत बी बिस्मिल्ला पिंजारी यांची धुळे महानगरपालिका धुळे यांचे कडे जमा असलेली पेंशनची सातव्या आयोगाच्या फरकाची रक्कम रुपये ५५,६६२/- (अक्षरी रुपये पंचावण्ण हजार सहाशे बासष्ट मात्र) हि रक्कम अर्जदार नं. १ ते ४ यांना मिळणेकामी भारतीय वारस कायदा कलम ३७२ अन्वये उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळणेकामी मे. कोर्टात दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जास ज्या कोणाची हरकत असेल त्यांनी आपली लेखी हरकत धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधिश सो. कस्तर कोर्ट नं. ४ यांचे कोर्टात दिनांक १०/११/२०२३ रोजी सकाळी १०:३० वाजता मे. कोर्टात स्वतः किंवा वकीलांमार्फत / प्रतिनिधी मार्फत हजर राहून सदर कामी आपले म्हणणे, तक्रारी व लेखी स्वरूपात हरकत सादर करावी. वरील तारखेस कोणाचीही लेखी स्वरूपात हरकत मे. न्यायालयात न आल्यास सदर कामी चौकशी होवून वरील अर्जदार यांना मयत न्यामत बी बिस्मिल्ला पिंजारी यांचे कायदेशिर वारस म्हणुन भारतीय वारस कायदा कलम ३७२ अन्वये उत्तराधिकारी प्रमाणपत्र (Succession Certificate) देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काहीही हरकत एकुन घेतली जाणार नाही व ग्राहय धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस कोर्टाचे सही शिक्क्यानिशी आज दि.०६/१०/२०२३ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

आदेशावरुन

**कामगीरी कारकून दिवाणी न्यायालय व.स्तर, धुळे** (शिक्का) **अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर, धुळे**

# वेदविद्येचे अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्चशिक्षणाच्या व्यापक संधी

नाशिक । प्रतिनिधी

महर्षी गौतम गोदावरी वेदविद्या प्रतिष्ठान व भोसला मिल्ट्री कॉलेज यांच्यात संशोधन आणि शैक्षणिक कार्यक्रमांतर्गत माहितीची देवाणघेवाण करण्यात येणार आहे. परस्पर सहमतीने अल्प मुदतीचे निरंतर शैक्षणिक कार्य एकत्रितपणे केले जाईल. त्याचा लाभ दोन्ही संस्थांमधील विद्यार्थ्यांना होईल. त्यामुळे वेदविद्येचे अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्चशिक्षणाच्या व्यापक संधी मिळतील.

यासंदर्भात नुकताच एक शैक्षणिक सामंजस्य करार करण्यात आला. त्यावर प्रधान आचार्य रवींद्र पैठणे गुरुजी व प्राचार्य डॉ.दिनेश नाईक यांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

नाशिकमध्ये वेदविद्येचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथमच उच्चशिक्षणाची अशी संधी यामुळे उपलब्ध झाली आहे. या कार्यक्रमाला



इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. प्रभावती जगताप, समन्वयक प्राध्यापक भारत गुगाणे, सहाय्यक प्राध्यापक विक्रम शर्मा व सागर आहेर उपस्थित होते. यापुढे विद्यार्थ्यांचे व्यापक हित लक्षात घेऊन संयुक्त विद्यमाने चर्चासत्रे, परिषदा व कार्यशाळा यांचे आयोजन करण्यात येईल. पदवीपूर्व, पदवीधर व डॉक्टरेट स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी संशोधनात्मक प्रशिक्षण कार्यक्रम संयुक्तपणे घेण्यात येतील. त्यासाठी लागणारे प्रशिक्षक, तज्ज्ञ मार्गदर्शक यांची व्यवस्था केली जाईल. यामुळे महर्षी गौतम गोदावरी वेदविद्या प्रतिष्ठानमधील विद्यार्थी भोसला मिल्ट्री कॉलेजमध्ये उच्चशिक्षण घेऊ शकतील. इंटर्नशीप करू शकतील. करारानुसार दोन्ही संस्थांमधील प्राध्यापक सहकार्य करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील. त्यांना उच्चशिक्षणासाठी प्रोत्साहन देतील. वैचारिक देवाणघेवाण होऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होईल. त्यांच्या कामगिरीचे विविध टप्प्यांवर मूल्यमापन करण्यात येईल. गुणप्रदान करून विद्यार्थ्यांनी केलेल्या संशोधनाचे तांत्रिक अहवाल तयार केले जातील. दोन्ही संस्थांच्या समन्वयासाठी अध्यापन व संशोधन विद्या शाखेतील एका सदस्याची नियुक्ती करण्यात येईल. पुढे एक स्वतंत्र समन्वय समिती गठीत करण्यात येईल. असे करारात नमूद करण्यात आले आहे.

## न्यूज कॉलम

### अष्टाणे शिवारात विहीरीमध्ये बुडून वृद्धाचा झाला मृत्यू

**धुळे ।** साक्री तालुक्यातील अष्टाणे शिवारातील विहिरीत पाय घसरुन पडल्यामुळे वृद्धाचा मृत्यू झाला. भिकन भाऊराव देवरे असे मृताचे नाव आहे. हा प्रकार समोर आल्यानंतर त्यांना साक्री ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### 'माजी सैनिकांनी भरतीचा लाभ घ्यावा'

**धुळे ।** धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील ५० वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या माजी सैनिकांसाठी १३६ इन्फंट्री बटालियन (टीए) इको, महारमध्ये नोकरी करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. त्याकरिता १०९ इन्फंट्री बटालियन (टीए) मराठा लाइट कोल्हापूर (महाराष्ट्र) येथे १७ ते २० ऑक्टोबर २०२३ या कालावधीत भरती प्रक्रिया सुरू होणार आहे. यासाठी माजी सैनिकांकरिता वैद्यकीय पात्रता शेप-१ व निवृत्तीवेळी चारित्र्य चांगले असलेल्या इच्छुक व पात्र माजी सैनिकांनी संपूर्ण माहितीसह १३ ऑक्टोबरपर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, धुळे येथे प्रत्यक्ष संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर डॉ. नीलेश पाटील यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये केले आहे.

# सरकारने कितीही डाव टाकू द्या, मराठा आरक्षण मिळवून देणारच

## नाशिक जिल्ह्यात मनोज जरांगेंचा निर्धार, हजारो बांधव उपस्थित

**नाशिक । प्रतिनिधी**



मराठा आरक्षणासाठी शासनाला ४० दिवसांची दिलेली मुदत २४ तारखेला संपत आहे. मी, खानदानी शेतकऱ्याचा पोरगा आहे. मराठा समाजाशी गद्दारी करणार नाही. सगळे मंत्रिमंडळ एकवटलं तरी मी माझी भूमिका विचलित होऊ दिली नाही. समाजानेही एकजूट दाखवावी. शासनाने कितीही डाव टाकू द्या ते उधळूनच लावू. जीव गेला तरी बेहत्तर समाजाला आरक्षण मिळाल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असा इशारा मराठा आरक्षणाचे लढवय्ये मनोज जरांगे पाटील यांनी दिला.

पांगरी येथे रविवारी (दि.८) सभेत ते बोलत होते. १४ तारखेला आंतरवली सराटी येथे मोठा कार्यक्रम आयोजित केला असून त्यासाठी राज्यभरातील मराठा बांधवांनी उपस्थित रहावे. उग्र आंदोलन, जाळपोळ करु नका. गुन्हे दाखल झाल्यास भविष्यात शिक्षणात तसेच नोकरीत अडचणी निर्माण होतील. आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलू नका. आरक्षणासाठी तरुण मरायला लागले तर आरक्षण घेऊन करायचे काय ? असा सवाल त्यांनी केला. कुठलाही डाग समाजावर लागू देऊ नका असा सल्ला दिला. ओबीसी आरक्षणासाठी विविध जाती मागास असल्याचे सिध्द होणे अपेक्षित असताना अनेक उपजातींचा ओबीसीत समावेश करुन शासनाने मराठा समाजाची खिल्ली उडवली आहे. ओबीसींचे आरक्षण २८ हून ३० टक्क्यांवर पोहचले, मात्र त्यास कुठलाही आधार नाही. देशातील एकमेव मराठा जात अशी आहे, ती मागास असल्याचे सिध्द झाले असून मराठा कुणबी असल्याचे ५ हजार पुरावे सापडले आहेत. या समाजाचा ओबीसीत समावेश झाला नसल्याची खंत त्यांनी बोलून दाखवली. राज्यभरातील मराठ्यांना कुणबी दाखले तलाठी स्तरावर सरसकट मिळाले पाहिजे, अशी मागणी छावाचे प्रदेशाध्यक्ष विलास पांगारकर यांनी केली. छावाचे संस्थापक अध्यक्ष किशोर चव्हाण यांनी मराठा आरक्षणासाठीचे बारकावे सांगितले. आमदार माणिकराव कोकाटे, माजी आमदार राजाभाऊ वाजे, विठ्ठल उगले, आदी उपस्थित होते. तर पांगरीत उपोषणास बसणार पांगरीत जनावरांच्या चारा-पाण्यासाठीच्या आंदोलनात पालकमंत्र्यांनी लक्ष दिले नाही तर स्वतः यासंदर्भात जिल्हाधिकारी, मुख्यमंत्र्यांशी बोलू आणि सिन्नर तालुक्यासह महाराष्ट्रात चारा-पाण्याची व्यवस्था करण्यास शासनास भाग पाडू. शासनाने दुर्लक्ष केल्यास स्वतः पांगरी येथे उपोषणास बसू असा इशारा त्यांनी दिला.

# आर्णी येथे विविध विकास कामांचे प्रा.अरविंद जाधव यांच्या हस्ते उद्घाटन

**धुळे । प्रतिनिधी**




तालुक्यातील आर्णी येथे जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा इंजि. अश्विनी पाटील यांच्या निधीतून मंजूर केलेल्या विविध विकास कामांचे भूमिपूजन व उद्घाटन जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती प्रा.अरविंद जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास गावातील प्रतिष्ठितांसह ग्रामस्थ उपस्थित होते. विविध विकास कामांचे उद्घाटन झाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

आर्णी गावातील विविध विकास कामांच्या भूमिपूजन प्रसंगी गावाचे सरपंच निलेश माळी, उपसरपंच संजय कोळी,माजी सरपंच प्रकाश कोळी, संदीप त्रिभुवन, नानाभाऊ माळी, गौतम एन्डाईत, बन्सीलाल भील , बोरसे सर यांचेसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सन २००३ ते २००८ या कालावधीत प्रा.श्री. अरविंद जाधव हे जिल्हा परिषद सदस्य असताना आर्णी येथे सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाच्या माध्यमातून मराठी शाळेच्या चार वर्ग खोल्या बांधकाम केलेल्या होत्या. त्या वर्ग खोल्यांचे दुरुस्तीसाठी रू.दहा लक्ष उपलब्ध करून दिलेले आहेत. मुलांना चांगले डिजिटल शिक्षण मिळावे यासाठी आर्णीच्या मराठी शाळेचा समावेश करण्यात आलेला आहे. त्याशिवाय गावामध्ये दलित वस्ती विकास कार्यक्रमातून सौर दिव्यांसाठी रू.दहा लक्ष रुपये उपलब्ध करून दिलेले आहेत. अपारंपारिक ऊर्जा कार्यक्रमाच्या माध्यमातून रू. सात लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. या सर्व कामांचे भूमिपूजन, उद्घाटन प्राध्यापक अरविंद जाधव यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. आर्णी गावाची एकंदरीत रचना लक्षात घेता गावामध्ये आदिवासी वस्तीत आदिवासी ठक्कर बाप्पा योजनेच्या माध्यमातून आदिवासी वस्तीतल्या रस्त्यांचे काँक्रिटीकरणाची कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. त्याच्याशिवाय दलित वस्ती कार्यक्रमाच्या माध्यमातून आर्णी येथे ज्या रस्त्यावर सातत्याने दलदल असते, अशा रस्त्याच्या कामाचा व त्यासोबत गटारीच्या कामाचा देखील लवकरच शुभारंभ करण्यात येईल व आर्णी गावाला स्मशान भूमी नसल्याकारणाने जन सुविधा कार्यक्रमाच्या माध्यमातून स्मशानभूमी या ठिकाणी प्रस्तावित करण्यात आलेली आहे. ग्रामस्थांनी आपल्या गावामध्ये सुरू होत असलेल्या या विविध विकास कामांच्या संदर्भामध्ये जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अश्विनीताई पाटील यांचे तोंड भरून कौतुक केले,आणि समाधान व्यक्त केले.

# जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित आज विविध कार्यक्रम

**नाशिक । प्रतिनिधी**

मनोदय माईंड केअर क्लिनिक आणि सनशाइन काउन्सेलिंग व थेरपी सेंटर यांनी येत्या जागतिक मानसिक आरोग्य दिनाच्या (१० ऑक्टोबर) पार्श्वभूमीवर संयुक्त विद्यमाने मानसिक आरोग्यावर आधारित मनोरंजक, स्पर्धात्मक आणि प्रबोधनपर कार्यक्रम आयोजित केला आहे.

दरवर्षी जागतिक मानसिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने मनोदय माईंड केअर क्लिनिक व सनशाईन कौन्सिलिंग अँड थेरपी सेंटर वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करत असतात. यावर्षी देखील त्यांनी अनेक कार्यक्रम आयोजित केले आहेत. या कार्यक्रमामध्ये काही स्पर्धा घेण्यात येणार आहेत. जसे सध्या सोशल मीडियाचा मोठा प्रभाव तरुण पिढीवर असल्यामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी रीलस् बनवण्याची स्पर्धा, ज्याचे विषय आहेत रिलेशनशीप इश्यूस, डिप्रेशन, आत्महत्या, व्यसन या विषयांवर एक ते दीड मिनटचे रील बनवणे. दुसरी शालेय मुलांसाठी वक्तृत्व स्पर्धा विषय: वयात येताना होणारे प्रेम- चूक की बरोबर, अभ्यासात येणारे अपयश कसे हाताळावे, डिजिटल वेल बिंग - स्क्रीन आणि मीडियाचा योग्य वापर, आयुष्यात परिवार आणि मित्र परिवारा यांचे महत्व. याचबरोबर सायकॉलॉजीच्या विद्यार्थ्यांकरता आंतरमहाविद्यालयीन क्विझ स्पर्धा घेण्यात येणार आहे. या सर्व स्पर्धांकरता विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि विजेत्याना आकर्षक बक्षीस देण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी ९६०७८९९६६० या क्रमांकावर संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### धुळ्यात होमगार्डतर्फे स्वच्छता मोहिम

**धुळे ।** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार महात्मा गांधी जयंतीनिमित्त होमगार्डतर्फे स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. यात जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, अप्पर पोलीस अधीक्षक तथा जिल्हा समादेशक अधिकारी होमगार्ड धुळे किशोर काळे, धुळे पथकाचे समादेशक अधिकारी दिनेश मराठे व त्यांचे सहकारी अधिकारी अजगरअली सय्यद, बाळू बैसाणे, मनीष बुवा, शेख लुकमान, अंशकालिक लिपिक सचिन घोडे, संतोष सूर्यवंशी, धुळे पथकाचे एकूण ७० पुरुष व २४ महिला होमगार्ड सहभागी झाले होते.

# श्री एस. ए. साकी यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**चिमठाणे । प्रतिनिधी**



दोंडाईचा येथील एस.ए.साकी यांना राज्यस्तरीय डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

धुळे येथील अजय लॉन्स नगाव बारी येथे राज्यस्तरीय डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण भारत सरकार व नॅचरल ह्यूमन राइट कौन्सिल फोरम यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित करण्यात आले होते. यावेळेस प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय सेनेचे कर्नल ब्रिगेडियर गणपती श्रीनिवासन, आ.कुणाल पाटील, जिल्हा परिषदेचे शिवाजी अकलादे यांच्या हस्ते करण्यात आले या कार्यक्रमाच्या वेळेस प्रमोद पाटील, ह्यूमन राईट फोरमचे अध्यक्ष गोरख देवरे उपस्थित होते.

श्री साकी सुलतानअली अख्तरहुसेन हे गेल्या अनेक वर्षांपासून विद्यार्थ्यांना शैक्षणिक सेवा तसेच विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन करणे रोजगार विमुख शिक्षणात प्रवेश करून देणे इत्यादी कामे केल्यामुळे भारत सरकार व नैसर्गिक मानव अधिकार फॉर्मने त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित केले.

श्री.एस.ए.साकी हे अहिंसा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे कार्यरत आहे. दोंडाईचा शहराचे नगरसेवक, व्यापारी, उद्योजक असे सगळ्यांनीच त्यांचे अभिनंदन केले आहे. त्यांचे सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

# भाविक मंडळाच्या जिल्हा प्रसार माध्यम प्रमुखपदी दिलीप साळुंके-भाऊसाहेब हुजबंड यांची सर्वानुमते निवड

**नाशिक । प्रतिनिधि**





अखिल भाविक वारकरी मंडळ नाशिक जिल्हा प्रसार माध्यम प्रमुख पदी जेष्ठ पत्रकार दिलीप साळुंके नाशिक व दै.आवाजचे भाऊसाहेब हुजबंड, विंचुर यांची निवड करण्यात आली आहे.

भाविक वारकरी मंडळाचे जिल्हाध्यक्ष हभप अशोक महाराज गांगुर्डे व जिल्हा सचिव हभप विलास महाराज सांगळे यांचे हस्ते दोघा मान्यवरांना नियुक्तीपत्र देण्यात आले. वारकरी संप्रदाय जगात खूप मोठा आहे, संत तुकाराम महाराज व संत ज्ञानेश्वर महाराज यांची किर्ती साता समुद्रापार साधुसंतांनी पोहोचवली आहे. आता आपल्याला त्यांचेच कार्य पुढे नेत टिकून ठेवत, प्रचार प्रसार करण्यासाठी संघटीत व्हावे लागणार आहे. एकसंघ भावनेने संघटीत होवून हे करण्यासाठी सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा संघटक हभप हिरामण महाराज जायभावे यांनी केले. जेष्ठ पत्रकार दिलीप साळुंके आणि भाऊसाहेब हुजबंड यांच्या निवडीचे स्वागत राष्ट्रीय अध्यक्ष हभप सुधाकर महाराज इंगळे, प्रदेशाध्यक्ष हभप जोतिराव चांगभले, प्रदेश संपर्कप्रमुख हभप आण्णासाहेब महाराज आहेर, जिल्हाध्यक्ष हभपश्री अशोक महाराज गांगुर्डे, सह जिल्हाध्यक्ष हभप तात्याबा महाराज बोराडे, जिल्हा उपाध्यक्ष हभप नंदु महाराज आहेर भालूर, जिल्हा संपर्कप्रमुख हभप शिवाजी महाराज खांडबहाले, नाशिक शहर अध्यक्ष हभप संजय महाराज सोनवणे, सिडको विभागिय अध्यक्ष हभप नवनाथ महाराज नागरे. नाशिक शहर संपर्क प्रमुख हभप शरद महाराज थोरात, महिला समिती जिल्हाध्यक्ष हभप सुमनताई शिंदे, सचिव हभप शालिनी पाटील, तालुका अध्यक्ष हभप दिनकर महाराज खांडबहाले, सचिव हभप देवराम महाराज भावले, संघटक हभप भास्कर महाराज ढगे, सातपूर शहर विभागीय अध्यक्ष हभप सुनिल महाराज निघोट, सातपूर शहर महिला विभागीय अध्यक्ष हभप सुमनताई पाटील यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांकडून ने त्यांचे स्वागत अभिनंदन केले आहे.

### भाजपच्या धुळे महानगर पेठ मंडळाची कार्यकारिणी जाहीर

**धुळे ।** येथील भाजपच्या धुळे महानगर पेठ मंडळाची नवी कार्यकारिणी निवडण्यात आली. त्यानूसार पेठ मंडळ अध्यक्षपदी जितेंद्र धात्रक, सरचिटणीसपदी शैलेश पावसकर, स्वप्नील कुळकर्णी, गोपाल शर्मा, शुभम पांडे, उपाध्यक्षपदी शिरीष शर्मा, जयेश पांडे, डॉ. प्रसाद घोरपडे, सुरज अहिरराव, प्रशांत जोशी, विजय सोनवणे, सचिन भारस्कर, सचिन मुंकुदे, चिटणीसपदी गणेश आगवणे, सोनू जाधव, ललित सोनवणे, हेमंत माळी, भूषण गुरव, नकुल बैरागी, सुमित सोनवणे, रमांकात भडागे, सोशल मिडीया संयोजकपदी निखिल तांबट, सहसंयोजकपदी भरत शर्मा, महिला आघाडीवर शीला भडागे, युवा मोर्चावर विनायक करनकाळ यांची निवड झाली.

# साक्रीत १६ ऑक्टोबर पासून शारदोत्सव व्याख्यानमाला

**साक्री ।ंतिनिधी**

साक्री शहराचे सांस्कृतिक वैभव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या येथील श्री छत्रपती शिवाजी वाचनालयाच्या २३ व्या शारदोत्सव व्याख्यानमालेस येत्या १६ ऑक्टोबर पासून सुरुवात होते आहे. १६ ऑक्टोबर ते २२ ऑक्टोबर या दरम्यान विविध मान्यवर वक्ते निरनिराळ्या विषयांवर आपले विचार पुष्प या व्याख्यानमालेत गुंफणार असून, वाचनालयाच्या सभागृहात दररोज सायंकाळी साडेपाच वाजता व्याख्यान होणार आहे. यानिमित्त साक्रीकर श्रोत्यांना बौद्धिक मेजवानी मिळणार आहे.

येत्या सोमवारी (ता.१६) सायंकाळी साडेपाच वाजता आमदार मंजुळा गावित यांच्या हस्ते व्याख्यानमालेचे उद्घाटन होईल. याप्रसंगी तहसीलदार तथा वाचनालयाचे पदसिद्ध अध्यक्ष साहेबराव सोनवणे अध्यक्षस्थानी असतील तर नगराध्यक्ष जयश्री पवार या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील. पहिल्या दिवशी मी जिजाऊ या विषयावर लासलगाव जि. नाशिक येथील प्रा.डॉ.प्रतिभा जाधव पहिले पुष्प गुंफतील, तर मंगळवारी (ता.१७) कुटुंब रंगले काव्यात या विषयावर विसुभाऊ बापट (मुंबई), बुधवारी (ता.१८) अमृत काळातील पंचसूत्रे या विषयावर प्रा.प्रकाश पाठक (धुळे), गुरुवारी (ता.१९) जगण्यातील आनंदाच्या वाटा या विषयावर डॉ.संजय कळमकर (अहमदनगर), शुक्रवारी (ता.२०) गीता आहे जीवन ग्रंथ या विषयावर प्रा.संजय पाटील (धुळे), शनिवारी (ता.२१) सावरकरांची सामाजिक क्रांती या विषयावर सात्यकी सावरकर (पुणे) विचार मांडतील. रविवारी (ता.२२) व्याख्यानमालेचा समारोप होणार असून, समारोपप्रसंगी आम्ही भारताचे लोक या विषयावर ज्येष्ठ संपादक संजय आवटे (पुणे) हे अखेरचे पुष्प गुंफतील. समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी वाचनालयाचे अध्यक्ष तथा तहसीलदार साहेबराव सोनवणे असतील तर साक्री दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे न्यायाधीश के.टी. अढायके, धुळे ग्रामीणचे उपविभागीय पोलीस अधिकारी साजन सोनवणे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील. व्याख्यानमालेस उपस्थितीचे आवाहन वाचनालयाचे अध्यक्ष साहेबराव सोनवणे, उपाध्यक्ष तथा सांस्कृतिक समिती प्रमुख प्रा.एल.जी.सोनवणे, कार्यवाह प्रा.डी.एन.खैरनार, सहकार्यवाह विजय भोसले, संचालक सुरेश सोनवणे, ए.जी.पठाण, आर.डी. भामरे, प्रा.व्ही.के.शाह, पी.झेड. कुवर, धनंजय सोनवणे, मनोज कार्ले, स्वीकृत संचालक जगदीश वाघ, स्वीकृत संचालक तथा सांस्कृतिक समिती सचिव आर.पी.भामरे, निमंत्रित सदस्य सतीश पेंढारकर, ग्रंथपाल उज्वल अग्निहोत्री आदींनी केले आहे.

# धुळे शहर काँग्रेस उपाध्यक्षपदी श्री बापू खैरनार यांची नियुक्ती

**धुळे । प्रतिनिधी**



धुळे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षपदी श्री बापू खैरनार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र विधी मंडळ नेते माजी मंत्री आ.बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते श्री खैरनार यांना नियुक्त पत्र देण्यात आले.

धुळे शहर व जिल्हा काँग्रेस पक्षातर्फे विविध पदाधिकार्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. सदर नियुक्तीचे पत्र एका समारंभात पदाधिकार्यांना देण्यात आले. मोराणे प्र.ल.धुळे येथील काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते श्री बापू खैरनार यांची नुकतीच धुळे शहर जिल्हा काँग्रेस पक्षाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांना माजी मंत्री आ.बाळासाहेब थोरात,आ. कुणाल पाटील यांच्या हस्ते एका कार्यक्रमात नियुक्ती पत्र देण्यात आले. श्री बापू खैरनार हे धुळे खरेदी विक्री संघाचे संचालक असून मोराणे प्र.ल.चे माजी सरपंच आणि सेवा सोसायटीचे माजी चेअरमन होते. ते काँग्रेस पक्षाचे सक्रीय कार्यकर्ते आहे. धुळे शहर काँग्रेसच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल बापू खैरनार यांचे निवड झाल्याबद्दल त्यांचे माजी मंत्री दाजीसाहेब रोहिदास पाटील, आ.कुणाल पाटील, धुळे जिल्हा शहर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ.अनिल भामरे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शामकांत सनेर,प्रदेश सरचिटणीस युवराज करनकाळ,बाजार समितीचे सभापती बाजीराव पाटील,ज्येष्ठ नेते प्रमोदभाऊ जैन,पं.स.माजी सभापती भगवान गर्दे,काँग्रेस तालुकाध्यक्ष डॉ. दरबारसिंग गिरासे,माजी सभापती गुलाबराव कोतेकर,मनपा विरोधी पक्षनेते साबीर खान,ज्येष्ठ नेते रमेश श्रीखंडे,डॉ.एस.टी.पाटील, संचालक साहेबराव खैरनार,खरेदी विक्रीचे चेअरमन लहू पाटील,उपसभापती योगेश पाटील,विशेष कार्यअधिकारी प्रकाश पाटील,माजी पं.स.सदस्य पंढरीनाथ पाटील,विजय देवरे, संचालक विशाल सैंदाणे,संचालक एन.डी.पाटील, संचालक ऋषीकेश ठाकरे, जि.प.सदस्य अरुण पाटील,काँग्रेस कार्याध्यक्ष अशोक सुडके,सेवा दल अध्यक्ष अलोक रघुवंशी, महिला काँग्रेस अध्यक्षा गायत्री जयस्वाल,रावसाहेब पाटील,गणेश गर्दे, सरपंच राजीव पाटील,हर्षल साळुंके यांच्यासह धुळे तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीतीचे सर्व संचालक,धुळे जिल्हा व तालुका काँग्रेसचे पदाधिकारी,कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले आहे.

# एकविरादेवी विद्यालयात शासकिय रेखाकला परीक्षा संपन्न

**धुळे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन कला संचालनालय मुंबई यांच्यातर्फे घेण्यात येणाऱ्या इलेमेंटरी व इंटरमिजीएट ग्रेड परीक्षा श्री. एकविरादेवी माध्य. विद्यालय देवपूर केंद्र क्र- १०४०१६ येथे घेण्यात आली इलेमेंटरी ग्रेड परीक्षेसाठी २५८ विद्यार्थी परीक्षेत प्रविष्ठ झाले तर इंटरमिजीएट ग्रेड परीक्षेसाठी २०७ विद्यार्थी परीक्षेत सहभागी झाले. देवपूर विभागातील हे केंद्र असल्यामुळे देवपूर व ग्रामीण विभागातील जवळपास १२ १. शाळेतील विद्यार्थी सहभागी झाले.

या केंद्रात केंद्रसंचालक म्हणून विद्यालयाच्या प्राचार्या अहिरराव पी. आर. तर सहाय्यक केंद्र संचालक श्री. गणेश फुलपगारे हे काम पहातात. आज दि. ०७/१०/२०२३ रोजी शासकिय आदेशान्वये स्कुल ऑफ आर्ट येथील चेतन मराठे. (सहाय्यक अधिव्याख्याता) व भटू भामरे - (सहाय्यक अधिव्याख्याता यांनी निरिक्षक चित्रकला व शिल्प महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशान्वये परीक्षा केंद्राला आज रोजी अचानक भेट दिली. ग्रामीण विभागातील जवळपास १२ १. शाळेतील विद्यार्थी सहभागी झाले.

CMYK

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र





# शूरवीर जिवाजी महाले यांची जयंती साजरी

## अखिल भारतीय जीवा सेनेच्यावतीने काढण्यात आली मोटरसायकल रॅली














धुळे । 'होता जिवा म्हणून वाचले शिवा' या म्हणीतून प्रखर राष्ट्रीय बाण्याचा वारसा अजरामर करणारे छत्रपती शिवाजी महाराज यांचे अंगरक्षक व एकनिष्ठ सेवक म्हणून त्यांची ओळख होती. आपल्या राजावर निष्ठा कशी असते हे त्यांनी प्रतापगडाच्या लढाईत शिवाजी महाराजांचे प्राण वाचवून दाखवून दिले. तेव्हा 'होता जीवा म्हणून वाचला शिवा' ही म्हण कायमची रुढ झाली. शिवरत्न वीर जीवाजी महाले यांनी वडिलांकडून पहिलवानाचे धडे घेत दांडपट्टा, चालवण्याचे शिक्षण घेऊन तरबेज झाले. त्यांच्या बलिदानाचे स्मरण व्हावे यासाठी दरवर्षी विविध ठिकाणी जिवा महाले यांची जयंती साजरी केली जाते. धुळ्यात जिवाजी महाले जयंतीनिमित्त अखिल भारतीय जीवा सेनेच्यावतीने मनोहर चित्रमंदिराजवळील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापासून काढण्यात आलेल्या मोटरसायकल रॅलीत सहभागी झालेले नाभिक समाज बांधव उपस्थित होते.

संकलन : दिपक वाघ

CMYK

दैनिक

# लक्ष महाराष्ट्र





# मायग्रेनशी संबंधित डोकेदुखी टाळण्यासाठी रात्रीची चांगली झोप गरजेची : डॉ. दिवाण

## सरस्वती हास्य योग केंद्रातर्फे व्याख्यान















नाशिक ।

डोकेदुखी, मायग्रेन आणि व्हर्टिगो या सामान्य लोकसंख्येमध्ये सामान्य समस्या आहेत. बहुतेक वेळा डोकेदुखी हे मायग्रेन किंवा टेन्शन यामुळे डोकेदुखीमुळे होते. डोकेदुखी, आम्लपित्त, मानदुखी, मळमळ आणि चक्कर येणे ही मायग्रेनशी संबंधित लक्षणे आहेत. तंदुरुस्त राहण्यासाठी आणि मायग्रेनशी संबंधित डोकेदुखी टाळण्यासाठी नियमित आणि चांगली रात्रीची झोप, नियमित आरोग्यदायी आहार, दररोज ३०-४० मिनिटांचा व्यायाम आवश्यक असल्याचे प्रतिपादन नारायणी हॉस्पिटल चे मेंदू व मणके विकार तज्ज्ञ डॉ. आनंद दिवाण यांनी केले. महिलांमध्ये वाढत जाणारी डोकेदुखी व चक्करच्या तक्रारी याविषयी महिलांमध्ये जनजागृती होण्यासाठी सरस्वती हास्य योग केंद्रातर्फे आयोजित व्याख्यान कार्यक्रमा वेळी डॉ. दिवाण बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी नगरसेविका संगीता जाधव, अध्यक्षा अरुणा जाधव, सीमा देवदास, टी. आर. येवले, आप्पा बाविस्कर उपस्थित होते. डॉ. दिवाण म्हणाले की, व्हर्टिगो देखील खूप सामान्य आहे-बहुतेक वेळा स्थितीसंबंधी व्हर्टिगो किंवा मायग्रेन संबंधित व्हर्टिगोचे निदान करण्यासाठी आणि उपचार घेण्यासाठी मेंदू विकार तज्ञाची भेट आवश्यक आहे. आज काल लोक डॉक्टरांना दाखविण्याएवजी घरगुती उपाय करतात. परंतु असे करून आजार वाढविण्यापेक्षा त्वरित डॉकरांचा सल्ला घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमास मोठया संख्येने महिला उपस्थित होत्या. बहुतेक वेळा डोकेदुखी हे मायग्रेन किंवा टेन्शन यामुळे डोकेदुखीमुळे होते. डोकेदुखी, आम्लपित्त, मानदुखी, मळमळ आणि चक्कर येणे ही मायग्रेनशी संबंधित लक्षणे आहेत.